दैनिक
आधुनिक शहरातील घडामोडी
# मेट्रो सिटी वृत्तांत
रविवार दिनांक 07/12/2025
METRO CITY VRUTANT
वर्ष 4थे
किंमत २ रु
पिंपरी चिंचवड व पुणे | पान 8 | अंक 01 | RNI - MAHMAR/2021/51259 | metrocity924@gmail.com | www.metrocityvrutant.in

# मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीसाठी 2 डिसेंबर रोजी मतदान झाले. मात्र ही मतदान प्रक्रिया राबवली जात असताना अंतिम दोन दिवसांमध्ये राज्यातील काही नगरपालिकांचे मतदान लांबणीवर टाकत ते 20 डिसेंबर रोजी तसेच त्यांची मतमोजणी 21 डिसेंबर रोजी होणार असल्याचा निर्णय घेतला गेला. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशानंतर सर्वच निवडणुकांची मतमोजणी लांबणीवर पडली. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. आज या प्रकरणाची सुनावणी झाली असताना सर्वोच्च न्यायालयाने मतमोजणी 21 डिसेंबराच होणार असल्याचे सांगितले आहे.**



सरन्यायाधीश सूर्य कांत व न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर मतमोजमीच्या विषयासंदर्भात सुनावणी पार पाडली. यावेळी खंडपीठाने निवडणुकांचा जो कालावधी निश्चित केला आहे. त्याच्या आत म्हणजेच 31 जानेवारीपूर्वी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. कोणत्याही कारणास्तव निवडणुका पुढे ढकलण्याचा प्रयत्न होऊ नये, असेही खंडपीठाने सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने सर्व पक्षकारांची बाजू ऐकून घेतल्यानंतर आपला निकाल दिला. 20 डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुका काही कारणास्तव जर पुढे ढकलल्या गेल्या तर पुन्हा निवडणुकीची प्रक्रिया पुढे ढकलली जाऊ शकते. मात्र तरीही 21 डिसेंबर रोजी 2 डिसेंबरला झालेल्या निवडणुकांचा निकाल जाहीर केला जावा.तसेच उच्च न्यायालयात ज्या याचिका प्रलंबित आहेत, त्यांचा कुठलाही व्यत्यय निवडणूक कार्यक्रमात येता कामा नये, असेही सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सांगितले.

राज्यातील सर्व 288 नगरपालिका व नगरपंचायतींची मतमोजणी 21 डिसेंबर रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने 2 डिसेंबरला दिला होता. यापूर्वी मतमोजणी 3 डिसेंबरला होणार होती. मात्र, सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार 24 नगरपरिषदा आणि 154 सदस्यांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. त्यामुळे 2 आणि 20 डिसेंबर रोजी झालेल्या निवडणुकांचा निकाल एकत्रित 21 डिसेंबर रोजी लागणार आहे.

# येत्या 22 डिसेंबरला आचारसंहिता!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : आगामी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी 20 किंवा 22 डिसेंबरला आचारसंहिता लागेल, असा दावा भाजप नेते, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केला. इतर पक्षातील शहरातील जे माजी नगरसेवक भाजपमध्ये येऊ इच्छित आहेत. त्यांच्या नावावर अगोदर स्थानिक गाभा समितीचे (कोअर कमिटी) एकमत होईल. त्यांचे एकमत झालेली नावे पुढे प्रदेशकडे पाठवली जातील. तशी नावे काढण्याचे काम सुरु असल्याचेही चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. उमेदवार अर्ज आणि उमेदवारी निश्चितीबाबत चर्चा झाल्याचे सांगून मंत्री



चंद्रकांत पाटील म्हणाले, 20 किंवा 22 डिसेंबरला महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागेल. आजपासून जो मागेल त्याला उमेदवारी अर्ज दिला जाईल. पुढील चार दिवस उमेदवारी अर्ज भरुन घेतले जातील. अर्ज देण्यासाठी कोणतेही शक्तीप्रदर्शन करायचे नाही. स्वत: इच्छुकाने पक्ष कार्यालयात येऊन अर्ज द्यावा. या अर्जांची छाननी केली जाईल. ते सर्व अर्ज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे पाठविले जातील.

एका खासगी संस्थेच्या माध्यमातून अर्जानुसार प्रत्येकाचा सर्व्हे केला जाईल. सर्व्हेच्या आधारे कोणाचे नाव पुढे आहे, त्यानुसार क्रमांक टाकले जातील. पूर्णपणे सर्व्हेच्या आधारे उमेदवारीचा निर्णय केला जाणार नसून त्याला आधार मानले जाईल. कोण निवडून येईल याबाबत स्थानिक पदाधिकाऱ्यांचे मत घेतले जाईल. सर्व्हे आणि पदाधिकाऱ्यांचे मत 90 ठिकाणी जुळते.दहा ठिकाणी जुळत नाही. स्थानिक पदाधिकाऱ्यांचे 90 टक्के नावांबाबत एकमत झाले, तर त्यात प्रदेश नेतृत्व कोणताही हस्तक्षेप करणार नाही. प्रदेशकडून अंतिम मान्यता दिली जाईल. उमेदवार निश्चित होताच जाहीर केले जातील, असेही चंद्रकांत पाटील सांगितले.

# देशातील विमान वाहतूक व्यवस्थेत तत्काळ सुधारणा करा

## खासदार श्रीरंग बारणे यांची केंद्र सरकारकडे मागणी

**पिंपरी - देशातील विमान वाहतूक क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेल्या गंभीर अव्यवस्थेमुळे प्रवाशांन मनस्ताप मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विमान उड्डाण रद्द होण्याचे प्रमाण वाढले असून विमानांची उड्डाणे 15 ते 20 तासांनी होत आहेत, यात तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. या अव्यवस्थेची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.**




याबाबत केंद्रीय नागरिक उड्डानमंत्री राम मोहन नायडू यांना निवेदन दिले आहे. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, इंडिगोच्या मोठ्या प्रमाणावर विलंबित आणि रद्द झालेल्या उड्डाणांमुळे लाखो प्रवासी अडचणीत सापडले आहेत. या परिस्थितीमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेसह देशाच्या विमान वाहतूक व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. मागील आठवड्यातील मंगळवार, बुधवार आणि गुरुवारी इंडिगोच्या उड्डाणांमध्ये अभूतपूर्व गोंधळ उडाला. कंपनीचा 'ऑन टाइम परफॉर्मन्स' 35 टक्क्यांवर घसरला. सुमारे 2,200 उड्डाणांपैकी तब्बल 1,400 उड्डाणे विलंबित झाली, तर 200 पेक्षा जास्त उड्डाणे रद्द करण्यात आली. या अव्यवस्थेचा परिणाम इतर विमान कंपन्यांवरही झाला असून पुणे विमानतळावरही अनेक उड्डाणे अचानक रद्द झाल्याने प्रवाशांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले.

विमान वाहतूक क्षेत्रातील कार्यप्रणाली आणि समन्वय यंत्रणेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. या अव्यवस्थेची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, या परिस्थितीत कोणताही सायबर हल्ला, तांत्रिक बिघाड किंवा नियोजित अडथळा कारणीभूत आहे का, याची सखोल तपासणी व्हावी, तसेच सर्व एअरलाईन्स आणि विमानतळ प्राधिकरणांमधील समन्वय प्रणाली मजबूत करण्यात यावी, अशी मागणीही खासदार बारणे यांनी केली आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेस आणि सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देऊन तातडीने उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. दीर्घकालीन उपाय म्हणून देशातील फ्लाइंग ट्रेनिंग स्कूल्सची संख्या आणि गुणवत्ता वाढविणे, पायलट व तांत्रिक प्रशिक्षणासाठी युवकांना प्रोत्साहन देणे, तसेच आपत्कालीन परिस्थितीत विमानतळ व एअरलाईन्स यांच्यातील समन्वय अधिक बळकट करणे यांसारख्या सूचना देखील त्यांनी सरकारसमोर मांडल्या आहेत. भारताची विमान वाहतूक प्रणाली ही राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीशी निगडित आहे. तिची सुरक्षितता, विश्वसनीय आणि अखंड कार्यप्रणाली राखणे ही केंद्र सरकारची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी असून, या प्रकरणात तात्काळ आणि ठोस कारवाई होणे आवश्यक आहे, असे खासदार श्रीरंग बारणे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

# शहरात पावणेदोन लाख होर्डिंगवर कारवाई

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृतपणे होर्डिंग, फलक, पोस्टर, बॅनर, किऑस्क लावून विद्रूपीकरण करणाऱ्यांवर आकाशचिन्ह व परवाना विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. वर्षभरात एक लाख 77 हजार 266 फलकांवर कारवाई केली.

111 नागरिक आणि व्यावसायिकांकडून 23 लाख 19 हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. त्याचबरोबर 17 जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात एक हजार 679 अधिकृत होर्डिंग आहेत. शहरातील सार्वजनिक ठिकाणी लग्न, वाढदिवस, स्वागत, निवडणूक, धार्मिक व अन्य कार्यक्रमांचे फलक अनधिकृतपणे लावले जातात. यामुळे शहर विद्रूप होत असून, वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे अशा




प्रकारचे फलक, होर्डिंग, किऑक्सवर आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या पथकांकडून कारवाई केली जात आहे.

अनधिकृत फलक उभारू नयेत, कार्यकर्त्यांना तशा सूचना द्याव्यात, असे पत्र प्रशासनाने सर्व राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधी आणि शहराध्यक्षांनाही दिले आहे. मात्र, त्यानंतरही शहरातील विविध भागांत अनधिकृत फलक, जाहिराती लावल्या जात आहेत.

आगामी महापालिका निवडणुकीमुळे सर्वच राजकीय पक्षांचे इच्छुक विविध कार्यक्रम घेत असून, अनधिकृतपणे जाहिरात करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे महापालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. आठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत अतिक्रमण पथकाने विशेष मोहीम राबविली.

14 ऑक्टोबर 2024 ते 30 नोव्हेंबर 2025 या कालावधीत एक लाख 77 हजार 266 अनधिकृत होर्डिंग, फलक, किऑक्सवर कारवाई केली आहे. शहर विद्रूप करणाऱ्या 111 व्यावसायिकांसह नागरिकांकडून 23 लाख 19 हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

## सामाजिक कार्याची निरंतर सेवा देणार व्यक्तिमत्व

# प्रसाद शंकर शेट्टी



प्रसाद शंकर शेट्टी हे मूळचे कर्नाटक उडपी जिल्ह्यातील असून शहरासाठी त्यांचे मोठे योगदान लाभले आहे. प्रसाद शेट्टी यांचे वडील शंकर राजू शेट्टी हे कर्नाटक उडपी जिल्ह्यातून व्यवसाय निमित्त 1968 साली शहरात चिंचवड स्टेशन येथे वास्तव्याला आले. या ठिकाणी ते भाड्याच्या घरात राहत होते .यानंतर प्रसाद शेट्टी हे आपले आईवडील दोन बंधू व एक बहीण अशा परिवारात चिंचवड स्टेशन येथील चाळीत राहिला होते.

त्यांनी आपले अकरावी पर्यंतचे शिक्षण शहरांमध्येच घेतले .त्यांच्या वडिलांनी चिंचवड स्टेशन येथे एक हॉटेल सदानंद भाड्याने घेऊन आपला व्यवसाय सुरु केला.

यानंतर त्यांचा प्रपंच सुरळीत सुरू असतानाच कालांतराने हॉटेलच्या मूळ मालकांनी हाॅटेल जबरदस्तीने हॉटेलचा ताबा घेतल्याने हॉटेल बंद करावे लागले. यावेळी कोणतेच उपजीविकेचे साधन नसल्याने प्रसाद शेट्टी हे आठवीत शिकत असताना पान टपरी व्यवसाय चिंचवड रेल्वे स्टेशन टिकीट घरासमोर सुरू केला.

त्यानंतर त्यांच्या वडिलांनी काही काळानंतर रामनगर चिंचवड येथे संतोष स्नेक्स सेंटर सुरू केले सुरु केले तेव्हा तेव्हा पान टपरी बंद करून प्रसाद व त्यांचे मोठे बंधू वडिलांना स्नॅक्स सेंटर मध्ये मदत करू लागले. या व्यवसायात पुरेसे आर्थिक उत्पन्न मिळत नसल्याने प्रसद शेट्टी यांनी पारटाईम बँक कलेक्शनचे काम सुरु केले .

यावेळी निगडी ते खडकी पर्यंत सायकलवर प्रवास करत कलेक्शनचे काम करू लागले. 1998 साली त्यांच्या लहान भावाचे शिर्डी वरून येताना तीन मित्रांसह अपघाती निधन झाले. ह्या दुःखातून सावरून त्यांनी 2002 रोजी आपल्या छोट्याशा हॉटेलचे मोठे हॉटेल बार व रेस्टॉरंट मध्ये रूपांतर केले .2002 साली त्यांचे मोठे बंधू प्रशांत शेट्टी यांनी आपल्या जनसंपर्काच्या जोरावर राष्ट्रवादी पक्षाचे अधिकृत उमेदवारी मिळवून चिंचवड स्टेशन परिसरातून महापालिकेची पहिली निवडणूक लढवली यात थोड्या मताने त्यांचा पराभव झाला .

आपल्या मोठ्या भावाचे पराभवाचे दुःख त्यांच्या मनात कायम राहिले परंतु पराभवाने खचून न जाता पुन्हा हॉटेल व्यवसायात त्यांनी लक्ष देऊन आपले सामाजिक काम सुद्धा सुरु ठेवले. या निवडणुकीनंतर तीन महिन्यानंतर लगेचच नातेवाईकांच्या लग्नानिमित्त त्यांचे आई-वडील, मोठे बंधू ड्रायव्हर व ते स्वतः गावाकडे जात असताना कर्नाटक राज्यातील कुंदापुरयेथील ञासीगाव येथे भीषण अपघातात त्यांचे आई-वडील, मोठे बंधू व ड्रायव्हर यांचे निधन झाले. सुदैवाने ते या मोठ्या अपघातातून प्रसाद शेट्टी हे एकटे बचावले .एक महिना रुग्णालयात उपचार घेऊन ते आपल्या घरी परतले. ते स्वतः या अपघातात वाचले परंतु संपूर्ण कुटुंब मात्र त्यांनी या अपघातात गमावले एवढ्या मोठ्या दुःखातून. सावरण्यासाठी त्यांना मित्रपरिवाराने मोठी साथ दिली .

यानंतर खचून न जाता परमेश्वराने आपल्याला मरणाच्या दारातून परत आणून जिवंत ठेवल्याने आपले यापुढील जीवन संपूर्ण समाजासाठी व समाजकार्यासाठी वाहून घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला. यानंतर आपला व्यवसाय प्रामाणिकपणे सांभाळून सन 2003 साली मोठ्या बंधूंच्या नावाने कै. प्रशांत शेट्टी प्रतिष्ठानची त्यांनी स्थापना केली.

त्यांना अपघाता वेळी वेळेवर उपचार न मिळाल्याने त्याची खंत मनात ठेवून त्यांनी शहरवासीयांसाठी मोफत रुग्णवाहिका सेवा सुरु केली .तसेच आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर ,अशा सामाजिक उपक्रम उपक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर समाजात वाढत्या हुंडाबळीच्या विरोधात त्यांनी अनेकदा विरोध दर्शवत स्वतः एक रुपयाही हुंडा न घेता स्वतःचे लग्न केले.आज ते आपल्या पत्नी व दोन मुलासह शहरात वास्तव्य करीत आहे.त्यानंतर गोरगरिबांसाठी मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याची सुरुवात त्यांनी केली.

आत्तापर्यंत साधारण 200 जोडप्यांचे संसार मोफत सामुदायिक विवाह सोहळ्यातून उभा करण्याचे पवित्र काम त्यांनी केले. या विवाह सोहळ्यात वधू-वरांना पोषाक, सोन्याचे अलंकार, संसार उपयोगी भांडी भेट स्वरूपात दिली. समाज कार्य करत असतानाच आपल्या स्वतःच्या आई-वडिलांची सेवा करण्याचे भाग्य न लाभल्याने ज्येष्ठ नागरिकांच्यातच आई-वडिलांना पाहून त्यांची सेवा करण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात ते दरवर्षी वृद्धाश्रम ,अनाथ आश्रम यांना मदत व सहकार्य करत असतात .आपल्या मोठ्या बंधूंचे नगरसेवक पदाचे स्वप्न अपूर्ण राहिले ते पूर्ण करण्यासाठी त्यांनी 2007 साली मनपा निवडणूक लढण्याचा आग्रह मित्रपरिवार व नागरिकांनी केला 2007 साली त्यांनी राष्ट्रवादी पक्षाकडे उमेदवारी मागितली परंतु पक्षाने उमेदवारी न दिल्याने त्यांनी पिंपरी चिंचवड महापालिका शिक्षण मंडळ सदस्य पदासाठी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला यात भरघोस मतांनी ते विजयी झाले. सन 2011 साली शिक्षण मंडळ उपसभापती पदाची संधी मिळाल्यानंतर त्यांनी मनपा शाळेतील शिक्षण पद्धती व गुणवत्ता वाढीसाठी विशेष काम केले .सन 2012 साली नगरसेवक पदासाठी पुन्हा ते इच्छुक राहून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे उमेदवारीची मागणी केली परंतु या वेळेसही पक्षाने उमेदवारी दिली नाही.



मात्र नागरिकांचा असलेला उदंड प्रतिसाद व मित्रपरिवाराची असलेली मोठी ताकद पाहून त्यांनी अपक्ष निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला व यात ते भरघोस मतांनी विजयी झाले.

याच वर्षी कै प्रशांत शेट्टी प्रतिष्ठानचे चार सदस्यही वेगवेगळ्या प्रभागातुन नगरसेवक पदी विजयी झाले.

त्यानंतर महापालिकेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना विधी समिती सभापती पदी काम करण्याची संधी दिली. 2013 साली क्रीडा समिती सदस्य म्हणून देखील त्यांनी महापालिकेत काम केले .

2014 ते 2016 दरम्यान ते स्थायी समिती सदस्य म्हणून महापालिकेत काम करीत होते हे काम करीत असताना आणि गोरगरीब आणि अडचणीत असलेल्या नागरिकांचे विविध प्रश्न त्यांनी मार्गी लावले .

2017 साली पुन्हा मनपा निवडणूक जाहीर झाली यावेळी पुन्हा निवडणूक ची तयारी सुरु झाली असताना नवीन प्रभाग रचना जाहीर झाल्याने त्यांना पुन्हा उमेदवारी डावलण्यात आली.

त्यावेळी पक्षातील नेत्यांच्या विनंतीचा आदर करत पक्षाशी एकनिष्ठ राहात निवडणूक न लढण्याचा निर्णय घेत पक्षाने दिलेल्या उमेदवाराचे प्रामाणिकपणे काम त्यांनी केले. 2002 सालापासुन त्यांनी हाती घेतलेले समाजकार्याचे व्रत आजतागायत अखंडपणे निरंतर सुरु आहे .

कै. प्रशांत शेट्टी प्रतिष्ठान व यशस्वी मित्र मंडळाच्या माध्यमातून गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी ,लग्नासाठी आर्थिक मदत ,वैद्यकीय औषध उपचारासाठी मदत, रुग्णालयासाठी मदत, अंध अपंगांसाठी आर्थिक मदत, अनाथआश्रम ,वृद्धाश्रमाला मदत तसेच खेळाडूंना प्रोत्सानासाठी त्यांचे मदतीचे कार्य निरंतर सुरु आहे.









## जिज्ञासू, संवेदनशील, कृतिशील, प्रामाणिक, सक्षम नेतृत्व

# निखिल उमाकांत दळवी



पिंपरी चिंचवड शहरात आकुर्डी परिसरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवासेनेचे उपशहरप्रमुख निखिल उमाकांत दळवी यांना कोणत्याही वेगळ्या परिचयाची गरज नाही, पिंपरी चिंचवड शहरात एक संयमी, विश्वासू युवा नेते म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. निखिल उमाकांत दळवी यांना सामाजिक कार्याचा वसा हा त्यांच्या घरातूनच मिळाला त्यांचे सख्खे चुलते माजी नगरसेवक सूर्यकांत रामचंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनात निखिल दळवी यांना सामाजिक आणि राजकीय कार्याचे धडे मिळाले.

निखिल दळवी हे प्रशासकीय काम असो किंवा सामाजिक काम किंवा राजकीय कार्य यामध्ये नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. प्रशासनातील कर्मचारी वर्ग, अधिकारी वर्ग आणि राजकारणातील राजकीय नेते यांच्या सर्वांच्याच सहकार्याने ते सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमी तत्पर असतात.

राजकीय क्षेत्रात काम करताना सत्ताधारी व प्रशासनाच्या चुकीच्या कारभारावर आवाज उठविण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलनात सहभाग घेतला, आपल्या प्रभागातील समस्या सोडविण्यासाठी अनेक वेळा त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले, अनेक सामाजिक उपक्रमात त्यांचा सहभाग हा कौतुकाचा विषय ठरला आहे.

त्यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात केली. 10 डिसेंबर 2015 रोजी निखिल दळवी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला, काही दिवस त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये काम केले त्यावेळी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष पदावर काम करण्याची संधी मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकत वाढविण्याचे काम निखिल दळवी यांनी प्रामाणिकपणे केले, परंतु राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा मधील गट बाजीला कंटाळून त्यांनी 2022 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा सदस्य व राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आणि 9 ऑगस्ट 2023 रोजी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षामध्ये पक्षाचे पक्षप्रमुख मा.उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या उपस्थितीत पुणे जिल्हा संपर्कप्रमुख मा.सचिन आहेर यांच्या हस्ते मुंबई मातोश्री येथे शिवबंधन बांधले व शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला त्या दिवसापासून शिवसेना पक्षाच्या संघटना वाढीसाठी त्यांनी काम सुरु ठेवले . सध्या ते युवासेना पिंपरी चिंचवड उपशहरप्रमुख म्हणून पक्षाचे कारभार सांभाळत आहे.

आपल्या प्रभागात त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले, स्वतः उपक्रमात सहभाग घेत त्यांनी प्रभागात एक सक्षम नेतृत्व उभे राहत असल्याची चुणूक आपल्या सामाजिक कामातून दाखवून दिली. पक्षाच्या माध्यमातून राज्य सरकार व केंद्र सरकार विरोधात अनेक निषेध आंदोलनात सहभाग, प्रभाग क्रमांक 14 मधील नागरिकांच्या तक्रारी सोडविण्या चे काम , प्रभाग क्रमांक 14 मधील दत्तवाडी विठ्ठलवाडी आकुर्डी मध्ये शिवसेना सदस्य नोंदणी आणि मतदार नोंदणी अभियान, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन तसेच प्रत्येक वर्षी अनेक सामाजिक उपक्रम निखिल दळवी यांच्या माध्यमातून राबविले जातात, प्रभाग क्रमांक 14 मध्ये स्वच्छता अभियान राबविले महानगरपालिके च्या अनेक उपक्रम यामध्ये निखिल दळवी यांचा सक्रिय सहभाग, सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये आकुर्डी तहसील कार्यालयासमोर जन आक्रोश आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग, प्रभागातील जीव घेणे रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांची संपर्क साधत रस्ते वाहतुकीसाठी सुरळीत करण्यामध्ये सक्रिय सहभाग, दरवर्षी वृक्षारोपण कार्यक्रम, तसेच दरवर्षी शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप, अनेक रक्तदान शिबिर, रोजगार मिळावे, प्रभागातील अनेक समस्या सोडविण्यासाठी निखिल दळवी यांचा सक्रिय सहभाग, सन समारंभ उदाहरणार्थ, नवरात्र उत्सव गणपती उत्सव असे अनेक उत्सव प्रभागातील नागरिकांच्या समवेत मोठ्या प्रमाणात साजरे करून पिंपरी चिंचवड शहरात सर्वांशीच राजकीय सामाजिक शैक्षणिक सर्व क्षेत्रातील मान्यवर नागरिक यांच्याशी आपुलकीचे जवळीक करणारे नाते निखिल दळवी यांनी निर्माण केले.

सध्या निखिल दळवी हे पिंपरी चिंचवड शहरात आगामी महानगरपालिका निवडणूक लढविण्यासाठी सज्ज झाले आहे. प्रभागातील नागरिकांच्या तसेच मतदारांच्या आग्रहा खातर निखिल दळवी हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवडणूक लढविण्यासाठी तयारी करत आहेत. प्रभागातील नागरिकांचे त्यांचे जवळचे नाते निर्माण झाले आहे आणि आपल्या सामाजिक कामातून, आपल्या विकसनशील दृष्टिकोनातून ते प्रभागातील मतदारांच्या मनावर राज्य करणारे एक युवा नेतृत्व म्हणून समोर येत आहे. याचा त्यांना महानगरपालिकेच्या निवडणुकीत नक्कीच फायदा होईल यात शंका नाही. पिंपरी चिंचवड शहरात एक जिज्ञासू,संवेदनशील, कृतिशील, प्रामाणिक, सक्षम, नेतृत्व म्हणून निखिल दळवी यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या याच सर्व सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना यंदाचा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.













## महिला सक्षमीकरणासाठी नेहमी आग्रही असणाऱ्या,सामाजिक कार्यकर्त्या

# सीताताई राम केंद्रे



पिंपरी चिंचवड शहरातील जाधववाडी परिसरात सामाजिक कार्यकर्त्या म्हणून सीता ताई केंद्रे यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. सीताताई केंद्रे या एक समाज सेविका आहेत तसेच त्या एक छोटीशी कॅन्टीन चालवतात. अनेक वर्षापासून जाधववाडी परिसरातील नागरिकांच्या मदतीला धावून जाणे हा त्यांचा विशेष स्वभाव असल्याने अनेक गरीब कुटुंबाला त्यांच्या वतीने मदतीचा हात दिला जातो. त्या स्वतः अनेक वर्षापासून वृद्धाश्रम ,अनाथाश्रम असा संस्थांमध्ये जाऊन संस्थांना मदत करतात. तसेच महिला सक्षमीकरणासाठी त्या नेहमी आग्रही राहिल्या आहेत. महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे , त्या रोजगारासाठी कर्ज उपलब्ध करणे असे अनेक उपक्रम ते राबविण्यात आल्या आहेत त्यांच्याकडे सध्या 14 महिला बचत गट कार्यरत आहेत.

महिलांनी नेहमी पुढे यावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे, स्वतःची रोजगार निर्मिती करावी, यासाठी त्या महिलांना नेहमी मार्गदर्शन करत असतात. शालेय विद्यार्थ्यांना युनिफॉर्म, शालेय भेटवस्तू त्या देत असतात. प्रत्येक वर्षी महिला दिनाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड शहरातील विधवा व घटस्फोटीत महिलांना त्या साड्या व अन्नधान्य देऊन त्यांचा सन्मान करत असतात.

समाजकारणाबरोबरच सीताताई केंद्रे यांनी राजकारणातही भूमिका बजावली आहे.

आम आदमी पक्षाच्या कार्यकारणी मध्ये त्यांनी अनेक वर्षे काम केले आहे.

परंतु आता त्या राजकारणापासून दूर असून समाजकारणच करत आहेत. आपण आपल्या पद्धतीने समाजाला जी काही मदत करायची असते ते मी करत आले आहेत, मला आता राजकारणाची गरज नाही असे त्या नेहमी सांगत असतात, एखाद्याला मदत करणे ,समाजकार्य करणे यासाठी राजकारण आवश्यक नसून आपल्या मनात समाजकार्याची भावना असणे आवश्यक असते असे त्यांचे मत आहे. अशा या समाज सेविका सिताताई राम केंद्रे यांना या वर्षीचा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

## कर्नाटकातील खून प्रकरणातील आरोपी पुण्यात अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

धनकवडी : कर्नाटकातील तुमकुर जिल्ह्यात घडलेल्या खून प्रकरणातील आरोपी मधू याला पुण्यात नाट्यमय पद्धतीने अटक करण्यात आली. स्वतःचा मोबाईल बंद करून घरी ठेवत पोलिसांना दिशाभूल करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीचा पर्दाफाश मात्र एका सहप्रवाशाच्या मोबाईलवरून केलेल्या फोनमुळे झाला.

खून करून मुंबईकडे पळ काढण्यासाठी आरोपी मधू पुण्याजवळ पोहोचला होता. मात्र प्रवासादरम्यान त्याने बसमधील एका सहप्रवाशाचा मोबाईल घेऊन आपल्या वडिलांना फोन केला. या कॉलचे लोकेशन मिळताच कर्नाटक पोलिसांनी बस क्रमांक, ट्रॅव्हल एजन्सी आणि मार्गाची खातरजमा केली. त्यानंतर तात्काळ शर्मा ट्रॅव्हल्सशी संपर्क साधत बस ड्रायव्हरला आरोपीवर लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या. ड्रायव्हरकडून वेळोवेळी मिळणाऱ्या लोकेशनमुळे पथक आरोपीच्या मार्गावर होते.

पुणे शहर पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे यांनी स्थानिक पथकाला सतर्क केले. बस पुण्यात दाखल होणार असल्याची माहिती मिळताच कात्रज चौकात अंमलदार रवींद्र भोरडे यांना बस थांबवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. बुधवारी (3 जानेवारी) सकाळी दहाच्या सुमारास बस कात्रज येथे पोहोचताच भोरडे यांनी ती अडवली आणि सीट क्रमांक 5 वर बसलेला आरोपी मधू याला ओळखून ताब्यात घेतले.

## एसबीपीआयएम मध्ये 'निर्भया जनजागृती' सत्र संपन्न



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - विद्यार्थिनींनी प्रवास करत असताना, सार्वजनिक ठिकाणी वावरत असताना स्वसंरक्षण याबाबत जागरूक राहिले पाहिजे. प्रत्येकीने आपल्या मोबाईल मध्ये सुरक्षिततेसाठी दामिनी पथकाचा नंबर सेव्ह करून ठेवावा. रिक्षा, टॅक्सी सारख्या सार्वजनिक वाहनातून प्रवास करण्याअगोदर 'पॅनिक बटन' कसे वापरावे हे समजून घ्यावे. वैयक्तिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्यास कायदेशीर हक्क वापरा असे आवाहन ॲड.अक्षता नेटके यांनी केले. आहार आणि मानसिक स्वास्थ चांगले असल्यास करिअर वर लक्ष केंद्रित करता येते. आपला आहार उत्तम असेल तर रोग प्रतिकार शक्ती वाढण्यासाठी उपयोग होतो, असे मार्गदर्शन डॉ. मिताली मोरे यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) तर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, बोर्ड ऑफ स्टुडंट्स डेव्हलपमेंट विभागाच्या सहकार्याने 'निर्भया जनजागृती' सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर, डॉ. मिताली मोरे, समन्वयक डॉ. रूपाली कुदारे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. काजल महेश्वरी आदी उपस्थित होते.

## देश सेवेचा इतिहास व सामाजिक कार्याचा वसा जपणारे

# लक्ष्मण सर्जेराव शिंदे



लक्ष्मण सर्जेराव शिंदे. हे मुक्काम पोस्ट खोजेवाडी तालुका जिल्हा सातारा येथील मुळचे सध्या ते . शितोळे एम्पायर नवी सांगवी येथे वास्तव्यास आहेत व नोकरी किर्लोस्कर ऑइल इंजिन लिमिटेड खडकी करत आहेत .ते गेली 27 वर्ष कार्यरत आहेत. त्यांना सामाजिक कार्याची खूप आवड आहे ते स्वतः जॉब करून आपला बहुमूल्य वेळ. समाजकार्यासाठी देतात त्यांची पत्नी सौ .सारिका लक्ष्मण शिंदे .या सुद्धा भैरवनाथ शिक्षण संस्था बाणेर येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.

त्यांना एक मुलगी आणि एक मुलगा आहे ते दोघेही सुशिक्षित आहेत.लक्ष्मण सर्जेराव शिंदे. ते त्यांच्या कंपनीमध्ये जर वर्षी स्वतः रक्तदान करतात आणि इतरांना रक्तदान करण्यास प्रेरणा देतात. किर्लोस्कर कंपनीमध्ये कला क्रीडा समिती वरती सभासद आहेत . कामगारासाठी खेळाचे आयोजन करणे तसेच बाहेर सुद्धा त्यांची कामे चांगले आहेत. उदाहरणार्थ रक्तदान करणे रक्तदान शिबिर भरवणे. गोरगरीब गरजू लोकांना अन्नदान करणे. अनाथ मुलांना अनाथ वयस्कर लोकांना अन्नदान आणि कपडे वस्त्रदान करणे .तसेच अपंग आणि विधवा गरजू लोकांना धान्य वाटप करणे. कपडे वाटप करणे .तसेच त्यांना चालण्यासाठी साधने उपलब्ध करून देणे .तसेच स्वच्छता अभियान मध्ये सहभाग घेणे. उदाहरणार्थ नदी स्वच्छता अभियान ग्राम स्वच्छता अभियान राबवणे सहभाग घेणे. स्वच्छता अभियानामध्ये सहभाग घेणे पर्यावरणाला धोका न होता प्लास्टिकचा वापर कमी करणे. कापडी पिशव्यांचा वापर करणे. परिसर सोसायटीमध्ये स्वतःच्या परिसर स्वच्छ ठेवणे व दुसऱ्यांना प्रेरणा देणे. तसेच नद्या तलाव सोसायटीमध्ये साठलेले पाणी. गावाकडील साठलेले गटारे येथे अभियान राबवणे. व सहभाग घेणे. दुसऱ्यांना प्रेरित करणे .तसेच शालेय विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक गरीब गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके वही पेन्सिल साहित्य दप्तर वाटप करणे. 15 ऑगस्ट व 26 जानेवारी या दिवशी मुलांना खाऊ स्कूल बॅग वही पुस्तक दप्तर यांचे वाटप करणे. सातारा मित्र मंडळ सांगवी नवी सांगवी गुरु पिंपळे या मंडळाचे ते मुख्य सदस्य आहेत. त्या मंडळातर्फे गोरगरी विद्यार्थ्यांना गोरगरीब मूकबधिर तसेच आदू लोकांना मदत करणे .अन्नदान धान्यवाटप साहित्य पुरवणी तसेच वृक्ष रोपण करण्यास लोकांना प्रेरित करणे. वृक्षारोपण करणे झाडे लावणे झाडे जगवणे. वृक्षारोपण रक्तदान शिबिरे भरवणे .तसेच दीनदुबळ्या लोकांना मदत करणे. गरीब गरजू नागरिकांसाठी मेडिकल कॅम्प उभारणे. रक्तदान कॅम्प उभारणे त्यांना गड किल्ले संवर्धन करणे स्वच्छता करणे. प्लास्टिक मुक्त भारत अभियान राबवणे .मदत करणे. कुष्ठरोग क्षयरोग अनाथ मुले यांना धान्य वाटप मेडिकल किट वाटप वाटप करणे अनाथ मुले वृद्ध वृद्धाश्रम या लोकांना अन्नधान्य वाटप. कपडे वाटप . वह्या पुस्तक वाटप. तसेच मेडिकल कॅम्प घेणे. शाळेतील अपंग गरजू विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करणे. 15 ऑगस्ट 26 जानेवारीला त्यांना कपडे देणे. व पुरवणे. यासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत 1) पहिला पुरस्कार सातारा मित्र मंड.ळ सांगवी नवी सांगवी पुणे यांच्यातर्फे सामाजिक कार्य 2022 - 23 पुरस्कार मिळाला. तसेच 2) 2024 रोजी. जनकल्याण सामाजिक सेवा संस्था कोल्हापूर यांच्याकडून राज्यस्तरीय पुरस्कार व सन्मान चिन्ह राज्यस्तरीय समाज गौरव पुरस्कार 2024 रोजी मिळाला. 3)2025 रोजी रोजी राधानगरी तालुका अपंग पुनर्वसन संस्था ठीकपुर्ली कोल्हापूर येथे राज्यस्तरी समाज गौरव पुरस्कार कोल्हापूर येथे मिळाला .4)तसेच किर्लोस्कर कंपनीकडून सन्मानचिन्ह व पुरस्कार मिळाला दोन्ही संस्थेमधून सन्मानपत्र व सन्मान चिन्ह समाज गौरव पुरस्कार मिळाला. गुणवंत कामगार कल्याण मंडळ यांच्याकडून दिंडीमध्ये सहभाग गोरगरिबांना खाऊ वाटप वारकऱ्यांना लाडू वाटप करणे त्यासाठी गुणवंत कामगार कल्याण मंडळाने सन्मानपत्र देऊन पुरस्कृत केले. तसेच कंपनी किर्लोस्कर ऑइल इंजिन लिमिटेड पुणे यांच्या माध्यमातून वारकऱ्यांना दरवर्षी लाडूचे वाटप व जर्किन छत्री यांचे वाटप करण्यात येते त्यामध्ये कंपनीमध्ये लाडू वाटप समिती वरती उपाध्यक्ष म्हणून काम केले. या कार्याचा गौरव म्हणून सन्मान पत्र देऊन पुरस्कृत केले केले आहे .

प्रत्येक वर्षी गणपती उत्सव दांडिया गरबा तसेच गोपाळकाला गोविंदा यामध्ये सक्रिय सहभाग असतो तसेच लक्ष्मण सर्जेराव शिंदे यांचे वडील मिलिटरी मध्ये बॉर्डर वर शिपाई म्हणून कार्यरत होते .त्यांनी देश सेवा करून देशासाठी कार्य केले .

म्हणून ही प्रेरणा आमच्या मध्ये आली आहे. माझे आजोबा .माझे वडील .माझे बंधू. हे सर्व मिलिटरी मध्ये देश सेवेसाठी काम करत आहेत.. करतात मला. त्यांच्यापासून प्रेरणा मिळाली माझे गाव हे सातारा जिल्ह्यात खोजेवाडी मिलिटरी अपशिंगे आहे. पूर्ण गाव हे जवानांचे गाव आहे. येथे घडती वीर जवान. आमच्या रक्ताच्या थेंबा थेंबात देश सेवा आहे. आणि ती राहणारच. ही माझे वचन आहे. असे त्यांनी सांगितले आहे. त्यांच्या याच सर्व सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना या वर्षीचा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

# सामाजिक कार्याचा ध्यास असणारं व्यक्तिमत्व

# सीमा शांतादेवी जयसिंगराव चव्हाण



पिंपरी चिंचवड शहरात थेरगाव परिसरात समाजकार्यात कार्यरत असणाऱ्या सौ. सीमाताई जयसिंगराव चव्हाण या सुशिक्षित असून त्यांचे शिक्षण एमए (सोशोलॉजी) पर्यंत झाले आहे.

लहानपणापासूनच त्यांना समाजसेवेची आवड. मध्य प्रदेशच्या दिवास येथे त्यांचा जन्म झाला, वडील पोलीस खात्यात पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत होते. तर त्यांच्या आजोळी सर्वच परिवारातले हे देशसेवेत होते. याकरिता त्यांच्या आजीला गोल्ड मेडल शासनाच्या वतीने मिळाले आहे, अशा या देशसेवा करणाऱ्या परिवारातून येणाऱ्या सीमाताई चव्हाण यांचे लग्न झाल्यानंतर

त्या महाराष्ट्रात आल्या. आपल्या आई-वडिलांच्याकडूनच मिळालेल्या देशसेवेचा वसा त्यांनी महाराष्ट्रातही सुरु ठेव ला. सामाजिक कार्यात त्यांनी विविध उपक्रम राबविले व तळागाळातील नागरिकांपर्यंत या उपक्रमाद्वारे लाभार्थ्यांना लाभ मिळवून दिला.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे 2014 पासून त्या आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचाराने तसेच नरेंद्र मोदी यांच्या कार्याने प्रभावित होऊन त्या राजकीय क्षेत्रात कार्यरत झाल्या. भारतीय जनता पक्षाच्या मार्फत त्यांनी आपले सामाजिक काम सुरु ठेवले.

केंद्र शासनाच्या मार्फत सुरु केलेल्या योजना या तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचण्याचे कार्य त्यांनी केले, उदाहरणार्थ जनधन योजनेमध्ये अनेक महिलांचे बँक खाते उघडून दिले. या उपक्रमात सीमाताई चव्हाण यांना असंख्य महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यांना मिळत असलेल्या प्रतिसादामुळे त्यांनी आपले काम जोमाने सुरु ठेवले. पुढे त्यांनी पंतप्रधान स्वनिधी मुद्रा लोन तसेच बिजनेस लोन अनेकांना मिळवून दिले. केंद्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणारे स्वच्छ भारत अभियान या उपक्रमात दरवर्षी त्या हिरीरीने सहभाग घेतात तसेच राजकीय क्षेत्रात काम करताना त्यांना विविध पदांवर सक्रिय राहता आले. यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या बेटी बचाव, बेटी पढाव या योजनेच्या मंडळात त्यांना काम करण्याची संधी मिळाली, त्यांनी या योजनेचा प्रचंड प्रमाणात प्रचार आणि प्रसार केला. या योजनेत अनेकांना लाभ मिळवून दिला, अनेक गरीब कुटुंबातील मुली या शिक्षणाकडे वाटचाल करायला त्यामुळे सुरुवात झाली. हे सर्व श्रेय सीमाताई चव्हाण यांच्या अथक प्रयत्नांना जाते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुरु झालेल्या उज्वला योजनेमध्ये अनेक कुटुंबांना सीमाताई चव्हाण यांनी थेरगाव परिसरात तसेच पिंपरी चिंचवड शहरात लाभ मिळवून दिला. सामाजिक कार्यात कार्यरत राहत असताना त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले. यामध्ये वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले, तसेच घरकाम करणाऱ्या महिलांना सुशिक्षित करणे, त्यांना रोजगार मिळवून देणे ,छोटे-छोटे उद्योग सुरु करून देणे, उद्योग निर्मिती करिता मदत करणे, मार्गदर्शन करणे असे अनेक उपक्रम सीमाताई चव्हाण यांच्या पुढाकाराने सुरु झाले. या उपक्रमाचा अनेक महिला मुली यांनी लाभ घेतला.

महिला बचत गट स्थापन करून अनेक महिलांना या बचत गटात सामावून घेतले. त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. अनेक सरकारी योजनांमधून या बचत गटातील महिलांना कर्ज काढून दिले, आज या महिला स्वतःच्या पायावर उभे आहेत, स्वतःचा व्यवसाय करीत आहेत, स्वतःची एक ओळख निर्माण करण्यासाठी महिलांना सीमाताई चव्हाण यांनी पुरेपूर मदत केली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरु असलेल्या योजना या अनेक तळागाळातील महिलांपर्यंत कुटुंबांपर्यंत पोहोचविण्याचे काम सीमाताई चव्हाण या करीत आहेत. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत अनेक प्रशिक्षण वर्ग सुरु आहेत. यामध्ये स्पोकन इंग्लिश, ब्युटी पार्लर, कम्प्युटर क्लासेस, मोटार ड्रायव्हिंग स्कूल अशा अनेक व्यावसायिक प्रशिक्षण वर्गात प्रशिक्षण घेण्यासाठी अनेक महिलांना, मुलींना सीमाताई चव्हाण यांनी प्रोत्साहित केले. त्यामुळे आज अनेक महिला व मुली आपापला व्यवसाय सुरु करून स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करत आहेत. याचेही श्रेय सर्व सीमाताई चव्हाण यांना जाते.

आपल्या संपूर्ण देशाने कोरोना काळ हा अत्यंत भीतीदायक व त्रासदायक ठरणारा काळ अनुभवला. या कोरोना काळात अनेक गरजू कुटुंबांना सीमाताई चव्हाण यांनी मदत केली. अनेकांना जीवनावश्यक वस्तूंचे किट वाटप केले, अनेकांना अन्नधान्य किट दिले, तसेच औषध, मास्क, कोरोना काळात ज्या वस्तूंची गरज अनेक कुटुंबांना होती, त्या सर्व वस्तूंची गरज पूर्ण करण्याचे काम सीमाताई चव्हाण यांच्या मार्फत करण्यात आले. या कोरोना काळामध्ये अनेकांना दोन वेळचे जेवण मिळणे कठीण झाले असताना सीमाताई चव्हाण यांनी अनेक कुटुंबांना अन्नधान्य पुरविले. कोरोना काळात अनेक महाराष्ट्रात काम करणारे कुटुंब जे महाराष्ट्र बाहेरून आले आहेत, जसे राजस्थान मधले काही कुटुंब, त्यांनाही सीमाताई चव्हाण यांनी मदत केली. जीवनावश्यक वस्तूंचे किट दिले, त्यांना दोन वेळचे जेवण मिळेल, अशी व्यवस्था केली. तसेच कोरोना काळात अनेकांसाठी प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविली. आजही सीमाताई चव्हाण यांना अनेकांचे फोन येतात ,ते वेळोवेळी सीमाताईंचे आभार व्यक्त करतात.

रेशन कार्ड बनविणे, आधार कार्ड बनविणे, तसेच पॅन कार्ड बनवून देणे असे अनेक उपक्रम सीमाताई चव्हाण यांच्या माध्यमातून आजही सुरु आहे.

कॅन्सर पीडित नागरिकांनाही सीमाताई चव्हाण यांच्यामार्फत सहाय्यता केली जाते. राम मंदिर निर्माण अभियानामध्ये सीमाताई यांनी सक्रिय सहभाग घेतला, त्याचबरोबर तिरंगा रॅली, अहिल्याबाई होळकर सप्ताह असे अनेक उपक्रम सीमाताई चव्हाण यांच्या पुढाकाराने राबविण्यात आले.

शासनाच्या चुकीच्या कारभारावर सीमाताई चव्हाण यांनी वेळोवेळी आवाज उठविला. अनेक आंदोलनात सहभाग घेतला, त्याचबरोबर प्रभाग क्रमांक 23 मध्ये अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक उपक्रम राबविले. त्यांच्या या कार्यामुळे आज थेरगाव परिसरात प्रभाग क्रमांक 23 मध्ये त्या सुशिक्षित नेतृत्व असलेल्या महिला म्हणून ओळखल्या जातात. आगामी येऊ घातलेल्या महानगरपालिका निवडणुकीमध्ये प्रभाग क्रमांक 23 चे नेतृत्व करण्याचे त्यांनी ठरविले आहे.

प्रभाग क्रमांक 23 मधील अनेक नागरिकांनी सीमाताई चव्हाण यांना आग्रह धरला आहे की, आगामी महानगरपालिका निवडणुकीत आपण उभे राहावे व आमचे प्रतिनिधित्व करावे, म्हणजे प्रभाग क्रमांक 23 मधील मतदारांना एक सुशिक्षित नेतृत्व मिळेल व प्रभागाचा आणखीन विकास करण्यास मदत होईल, याच दृष्टिकोनातून सीमाताई चव्हाण यांनी आपले पाऊल उचलले आहे. विकासाची दूरदृष्टी, सामाजिक कार्याची दृढ इच्छा, मतदारांचा पाठिंबा या बळावर आपण महानगरपालिका निवडणूक लढविणार आणि जिंकणार, असा आत्मविश्वास सीमाताई चव्हाण यांनी वेळोवेळी बोलून दाखविला आहे. भारतीय जनता पक्षाकडे त्यांनी उमेदवारी मागितली आहे आणि जर आपल्याला उमेदवारी मिळाली तर आपण मिळालेल्या संधीचे नक्कीच सोने करणार, असेही सीमाताई हे ठामपणे विश्वासाने सांगत असतात.

त्यांच्या या संपूर्ण कार्याची दखल घेत त्यांना यंदाचा मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार देण्यात येत आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.









# सामाजिक कार्याचा उंचावलेला आलेख

# विनोद सत्यशीला शंकरराव वरखडे



विनोद वरखडे हे मुळचे जालना जिल्ह्यातील असुन शहरात त्यांनी सुरु केलेल्या व्यवसायाची व त्यांच्या समाजकार्याची यशोगाथा भुषणीय आहे.

जालना जिल्ह्यात असताना घरोघरी वृत्तपत्रे वितरणाचे काम करुन मेकेनिकल डिप्लोमा पर्यंतचे शिक्षण घेऊन विनोद वरखडे सन 2008 साली पिंपरी चिंचवड शहरात रोजगाराच्या शोधात आले.या शहरात त्यांनी सुरुवातीला टाटा मोटर्स या कंपनीत हंगामी स्वरूपाचे काम सुरु केले. या दरम्यान त्यांची ओळख कामगार नेते बाबा कांबळे यांचीशी झाली.दोघेजण एकाच गावचे असल्याने बाबा कांबळे यांची मोठी साथ व सहकार्य विनिड वरखडे यांना लाभली .यावेळी अवघ्या 3500/- रुपये महिना पगारावर एका कंपनीत काम करत असताना तसेच घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असताना वरखडे यांच्या मामी सौ. संगीता नारायण झोल यांनी चांगला सांभाळ करत मोठ्या आपुलकीने सहकार्य केले. प्रामाणिकपणे काम करीत मिळेल त्या उत्पनातुन काटकसरीे ने स्वतःचे पिंपरी चिंचवड शहरात घर घेतले

द्वारका सोसायटी व लिगसी रिव्हर साईड.या सोसायटीत चेअरमन पदावर नियुक्ती झाल्यानंतर अनेक सामाजिक कामे करण्याची संधी मिळाली. सोसायटी व परिसरात आरोग्य शिबिर, वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम असे अनेकदा सामाजिक उपक्रम राबवले आहेत.

कोरोना काळात मोफत औषधे, फळे, भाजीपाला, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप विनोद वरखडे यांनी केले .2014 साली विनोद वरखडे यांनी स्वतःचा मोटर ड्रायव्हिंग स्कूलचा व्यवसाय सुरु केला .या व्यवसायाच्या माध्यमातून अनेक गोरगरीब, कष्टकरी,गरजु नागरिकांशी त्यांचा संपर्क आला त्यांच्या अडीअडचणी, समस्या जाणून त्यांना सहकार्य व मदत करण्याचे सामाजिक काम ते करत राहिले.

याचाच एक भाग म्हणून अनेक गरजू , होतकरू महिलांना स्वावलंबी बनाविण्यासाठी ना नफा ना तोटा या तत्त्वावर महिलांना ड्रायव्हींगचे प्रशिक्षण दिले. त्यांना व्यवसायाविषयी मोफत मार्गदर्शन केले, यामुळे त्या महिला आता स्वतः आपला उदरनिर्वाह करीत आहेत.,

विनोद वरखडे यांच्या या कार्याची दखल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष वाहतूक आघाडीच्या शहराध्यक्षपदी त्यांना काम करण्याची संधी दिली.

या संधीचे सोने करत आजपर्यंत अनेक गरजू नागरिकांना ,व्यावसायिक ड्रायव्हिंग शिक्षण देण्याचे काम त्यांनी सुरु ठेवले आहे.आपल्या व्यवसाय प्रमाणिकपणे करीत अनेक सामाजिक, सांस्कृतिक समज उपयोगी उपक्रम विनोद वरखडे यांच्या माध्यमातून राबविले जातात.वाहतुक आघाडी शहराध्यक्ष पदाच्या माध्यमातून वाहतूक निगडित प्रश्न, आर टी ओ , ट्रफिक विभागातील समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर रहाणारे विनोद वरखडे सध्या प्रसिद्धी प्रमुख मोटार ड्रायव्हिंग स्कूल ओनर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य, चेअरमन द्वारका हौसिंग सोसायटी, उपाध्यक्ष महाराष्ट्र वाहतूक पंचायत महाराष्ट्र राज्य, डायरेक्टर वेंदात मोटार स्कूल अश्या विविध पदांवर कार्यरत आहेत. आपल्या व्यवसाय व समाजिक कामातून शहरात नावारुपाला आलेले व्यक्तीमत्व ठरले आहे. पिंपरी चिंचवड शहरातील अनेक सामाजिक उपक्रम विनोद वरखडे यांचा सहभाग पहावयास मिळतो. पिंपरी चिंचवड शहरात आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण कार्यक्रम, रोजगार मिळावे, शालेय विद्यार्थ्यांना मदत, महिलांना सक्षम करण्यासाठी राबविलेले अनेक उपक्रम, कोरोना काळात गरजवंतांना केलेली मदत, कोरोना रुग्णांना केलेली मदत, दिवाळीनिमित्ताने अनेक गरीब कुटुंबांना दिवाळीचा आनंद मिळावा या हेतूने करण्यात आलेले सहकार्य, तसेच वाहतूक विभागातील अनेक समस्यांमध्ये नागरिकांना ते नेहमी सहकार्य करतात मदत करतात त्यांच्या सामाजिक कार्याचा आलेख हा उंचावत चाललेला आहे. त्यांच्या या संपूर्ण सामाजिक राजकीय कार्याची दखल घेत विनोद वरखडे यांना यावर्षीचा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत. आहे













•आधुनिक शहरातील घडामोडी
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
www.metrocityvrutant.in | रविवार दिनांक 07/12/2025

# सर्वसामान्यांच्या हाकेला साथ देणारे वाकडचे भूमिपुत्र

## रमजान सय्यद



आपल्या महाराष्ट्राची संस्कृती जपत सण समारंभ तसेच आपल्या देशाचे स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन ते मोठ्या उत्साहाने समाजातील प्रत्येक घटकांसमवेत साजरा करतात, यानिमित्ताने ते अनेक सामाजिक उपक्रम राबवतात, जेणेकरून समाजातील तळागाळातील कुटुंबांपर्यंत त्या उपक्रमाचा लाभ पोहोचेल असा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न असतो.

दरवर्षी आपल्या शहरातून देहू आळंदी येथुन वारकरी दिंडी सोहळा संपन्न होत असतो, वारकरी पंढरपूरला पायी वारीमध्ये हजारोच्या संख्येने सामील होत असतात, या वारकऱ्यांना दरवर्षी रमजान सय्यद यांच्या वतीने फळे वाटप व इतर जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येते. रमजान सय्यद यांच्या वतीने धार्मिक एकोपा वाढावा या उद्देशाने दरवर्षी ईद-मिलन कार्यक्रम साजरा केला जातो, यामध्ये हिंदू मुस्लिम व सर्व जाती धर्माच्या मित्रांना, नागरिकांना व कुटुंबीयांना एकत्रित आणण्याचे काम रमजान सय्यद यांच्यावतीने होत असते.

मागील काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघात जनसंवाद कार्यक्रम घेतला या जनसंवाद कार्यक्रमात सामान्य नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद पाहावयास मिळाला या जनसंवाद सभेतही रमजान सय्यद यांनी वाकड, ताथवडे, पुनावळे येथील अनेक समस्या अजितदादांसमोर मांडल्या अजितदादांनी या समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक पवित्रा दाखवत रमजान सय्यद यांना या समस्या लवकरात लवकर मार्गी लावणार असल्याचे आश्वासन दिले.

पिंपरी चिंचवड शहरातील राष्ट्रवादी पक्षाचे सरचिटणीस रमजान सय्यद हे अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. वाकडचे भूमिपुत्र म्हणून ते प्रसिद्ध आहेत, आपल्या सामाजिक कार्याने त्यांनी अनेकांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले आहे. सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात. पिंपरी चिंचवड मनपा शाळा वाकड येथे त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाले, त्यानंतर त्यांनी व्यवसायात आगे कूच केली. घर प्रपंच व व्यवसाय सांभाळताना त्यांनी सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतला, त्यांचे सर्व लहानपणीचे मित्रमंडळी हे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असल्याने त्यांनाही सामाजिक कार्याची आवड निर्माण झाली व त्यांनी सामाजिक कामाला सुरुवात करतच राष्ट्रवादी पक्षाच्या माध्यमातून राजकारणातही प्रवेश केला, राष्ट्रवादी पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या वतीने चुकीच्या कारभारावर रमजान सय्यद यांनी नेहमीच आवाज उठवला, त्यांनी अनेक आंदोलनात सहभाग घेतला, प्रशासन अधिकारी हे जनतेचे सेवक असतात त्यांनी जनतेची सेवा करावी भ्रष्टाचार करू नये, असे त्यांचे प्रामाणिक मत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका वतीने शहरात प्रस्तावित डीपी विरोधात जन आक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला होता या जन आक्रोश मोर्चामध्येही रमजान सय्यद यांनी मोर्चामध्ये सामील होत आपली उपस्थिती नोंदविली. व प्रशासनाचा कडाडून विरोध केला.

सामाजिक कार्य करताना रक्तदान शिबिर आरोग्य शिबिर रुग्णांना फळे वाटप तसेच युवकांना नोकरीच्या संधी असे अनेक उपक्रम रमजान सय्यद यांच्या पुढाकाराने राबविले जातात. रमजान सय्यद यांच्या वतीने वाकड परिसरात अनेक वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत .यांनी स्वतःच्या वाढदिवसानिमित्त वाढदिवसाचा खर्च टाळून गड किल्ले संवर्धनासाठी निधी दिला, सह्याद्री प्रतिष्ठान या संस्थेचे सह्याद्री संपर्कप्रमुख रवींद्र मोहोळ यांच्याकडे रमजान सय्यद यांनी गडकिल्ले संवर्धन कार्याला हातभार लावत मदत सुपूर्द केली होती. हे खूप उल्लेखनीय म्हणून यांचे कार्य म्हणावे लागेल.

नेहमी सर्वसामान्य जनतेच्या मदतीला धावून जाणारे रमजान सय्यद यांच्यावतीने अनेक सामाजिक संस्थांना अनाथ आश्रमांना मदत केली जाते.

सर्वसामान्य नागरिकांच्या हाकेला साथ देणारे, प्रत्येकाच्या अडचणीला धावून येणारे ,तसेच वाकड परिसरात अनेक सामाजिक उपक्रम राबविणारे वाकड चे भूमिपुत्र सामाजिक कार्यकर्ते रमजान सय्यद यांना यंदाचा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.













# विकासाचे व्हिजन व दूरदृष्टी असणारे नेते, पिंपळे निळखचे भूमिपुत्र

## शिरीष संभाजीराव साठे



पिंपरी चिंचवड शहरातील पिंपळे निळख हे एकेकाळचे छोटेसे गाव गावाचे उपनगर झाले प्रत्येक भाग हा विकसित व्हायला सुरुवात झाली याच गावातून पिंपळे निलख चे भूमिपुत्र असणारे शिरीष अप्पा साठे यांनी पिंपळे निळख चा विकास, हाच एकाच ध्यास घेतला असून त्यांनी आगामी महानगरपालिका निवडणुकी करिता तयारी सुरु केली आहे.

लहानपणापासूनच मैदानी खेळ, तालिमीची आवड व सामाजिक काम करण्याची सवय तसेच लहानपणापासूनच राजकीय कुटुंबात त्यांचा वावर त्यामुळे एक सक्षम नेतृत्व म्हणून शिरीष अप्पा साठे पिंपळे निळख गावातून नावारूपाला आले आहे.पिंपळे निळख परिसरात लहान थोर कोणीही असो त्यांच्या मदतीला धावून जाणे व आपल्या परीने अनेक नागरिकांची कामे मार्गी लावणे असा शिरीष अप्पांचा स्वभाव सर्व परिचित आहे. प्रतिष्ठित अश्या साठे पाटील कुटुंबात जन्मलेल्या शिरीष अप्पा यांना घरातूनच समाजकार्याचे बाळकडू मिळाले, समाजकार्याची आवड असल्याने पिंपळे निळख गावाच्या विकासात साठे कुटुंबियांचा मोठा वाटा राहिला आहे. त्यामुळे गावाच्या परिसरात आप्पा या आदरयुक्त टोपण नावाने ते सर्व परिचित आहे.

पिंपळे निळख परिसराचा विकास हे एकच ध्यास शिरीष अप्पा साठे यांना आहे. पिंपरी चिंचवड शहरातील उपनगर म्हणून पिंपळे निळख ला विकासाच्या प्रवाह सोबत जोडण्यासाठी येथे शिरीष अप्पा साठे यांना भरीव काम करायचे आहे. शहराने स्मार्ट सिटी म्हणून संपूर्ण देशात नवलौकिक मिळविला आहे. त्या विकासाच्या प्रवाहात पिंपळे निळख चा चेहरा मोहरा बदलून पिंपळे निळख म्हणजे स्वच्छ सुंदर उपनगर अशी ओळख निर्माण करण्यासाठी त्यांना काम करायचे आहे. आपल्या सामाजिक कार्याने पिंपळे निळख च्या विकासात भर घालायची आहे ,असा विचार शिरीष अप्पा साठे हे नेहमी बोलून दाखवतात. पिंपळे निळख तसा संरक्षण विभागाच्या हद्दीतील उजाड परिसर परंतु हरित पिंपळे निळक ही संकल्पना राबवीत वृक्ष संरक्षण व संवर्धन संस्थेच्या माध्यमातून शिरीष अप्पा साठे यांनी विविध प्रकारच्या झाडांचे रोपण व संवर्धनाचे काम मनापासून येथे केले आहे. हरित पिंपळे निळख या उपक्रमात त्यांनी मोठे योगदान दिले आहे, याची दखल घेत त्यांना सन्मान भूमिपुत्रांचा या सोहळ्यात भूमिपुत्र सन्मानाने गौरविण्यात आले आहे. नागरिकांच्या विविध प्रश्नांसाठी प्रभाग स्तरावरुन नियोजनात्मक काम करणे तसेच प्रत्येक भागातील समस्यांचे निराकरण करून विकासाच्या प्रवाहात पिंपळे निळख चा दर्जा उंचावण्यासाठी शिरीष अप्पा साठे नेहमी प्रयत्नशील आहेत .

मनमिळाऊ स्वभाव, सर्वसामान्यांच्या हाकेला धावून जाणे, गोरगरिबांच्या अडचणी सोडविणे, कुठलीही प्रश्न असो त्याचे निराकरण करून काम तडीस नेणे ही आप्पांची खासियत त्यामुळे जनमानसातील समाजसेवक म्हणून शिरीष अप्पा साठे यांनी जनसामान्यांच्या मनात स्थान मिळविले आहे. कोणाच्या संकटकाळात धावून जातात , तसेच कोरोना सारख्या अति भयंकर काळात सामाजिक बांधिलकी जपत श्री आप्पा साठे युथ फाऊंडेशन च्या माध्यमातून आप्पांनी गरजू कष्टकरी कामगार आणि गरजू नागरिकांना अन्नधान्य जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले तसेच मास्क, सॅनिटायझर, वैद्यकीय मदत इत्यादी सेवा पिंपरी-निळख भागातील नागरिकांना पुरविल्या आहेत. औषध फवारणी, सार्वजनिक स्वच्छता या गोष्टीवर भर दिला आहे. तसेच या संकटकाळात पिंपळे निळख मधील रहिवाशांना दिलासा देण्याचे काम प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिरीष अप्पा साठे यांनी केले आहे,

प्रभागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या त्वरित सोडविल्या जाव्यात यासाठी शिरीष आप्पांनी महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून प्रलंबित कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे. येथील रखडलेली रस्त्यांची कामे, रस्त्यावरील पडलेले खड्डे दुरुस्त करणे, सार्वजनिक स्वच्छता ,वाहतुकीची समस्या या सर्व बाबींचा पाठपुरावा करून ते मार्गी लावण्याचे काम श्रीश अप्पा साठे यांनी केले आहे. तसेच पिंपळे निळख मधील रहिवासी नागरिकांना पाणीपुरवठा हा सुरळीत व स्वच्छ व्हावा यासाठी प्रत्येक जनसंवाद सभेत श्रीश अप्पा साठे यांनी पाठपुरावा केला आहे.

समाजात सतत वावरत असल्याने तळागाळातील नागरिकांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेणे त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे ही त्यांच्या कामाची पद्धत आहे.सर्व लोकांच्या सुखदुःख प्रसंगी कायम मदतीसाठी हात पुढे करणे असे हे व्यक्तिमत्त्व आहे. आपल्या विविध सामाजिक कार्याच्या जोरावर शिरीष अप्पा साठे यांनी पिंपळे निळखकरांच्या हृदयात आप्पा म्हणून आपुलकीचे स्थान मिळविले आहे.

पिंपळे निळख चा सर्वांगीण विकास हेच ध्येय समोर ठेवून शिरीष अप्पा साठे युथ फाऊंडेशन व छत्रपती युवा प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्य या परिसरात जोमाने सुरु आहेत, प्रभागाच्या नवनिर्मितीचा ध्यास घेऊन समाजकारणाला महत्त्व देणारा सर्व धर्मातील नागरिकांना सोबतीला घेऊन वाटचाल करणारा व सर्वच क्षेत्रांची जान तसेच दूरदृष्टी असलेले सक्षम व्यक्तिमत्व म्हणून शिरीष अप्पा साठे ओळखले जातात.

पिंपळे निळख परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी शिरीष अप्पा साठे हे 24 तास उपलब्ध असणारा हक्काचा माणूस म्हणून ओळखले जातात , समाजाच्या प्रत्येक नागरिकांना आप्पांच्या या कार्याची ओळख आहे. रात्री अपरात्री घडलेल्या दुःखद घटना असो व इतर कोणत्याही अडी अडचण किंवा समस्या असो नागरिकांच्या हाकेला धावून त्यांच्या अडचणी सोडविणे हा आप्पांचा स्वभाव आहे. दहीहंडी उत्सव, गणपती उत्सव, नवरात्र उत्सव व इतर धार्मिक आणि सामाजिक कामातून पिंपळे निळख मध्ये त्यांनी मोठे वलय निर्माण केले आहे. अशा या नेहमी सर्वांच्याच अडीअडचणीला धावून जाणाऱ्या,विकासाचे व्हिजन व दूरदृष्टी असणारे,पिंपळे निळखचे भूमिपुत्र शिरीष अप्पा साठे यांना यावर्षीचा मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.












## संघर्षातून घडलेला विचारांनी प्रेरित आणि समाजासाठी झटणारा युवक

# अभिजित तानाजी कदम

पिंपरी चिंचवड शहरातील शबनम न्यूज मीडिया ग्रुप या वृत्तसंस्थेच्या वतीने दरवर्षी मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार दिला जातो समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. असेच पिंपरी चिंचवड शहरातील संघर्षातून घडलेला विचारांनी प्रेरित आणि समाजासाठी झटणारा विद्यार्थी युवा नेतृत्व म्हणून ज्याने आपली ओळख निर्माण केली आहे अशा अभिजीत तानाजी कदम यांच्याशी आम्ही संवाद साधला असता त्यांनी आपल्या स्वतः विषयी माहिती देताना त्यांच्या आयुष्यातील अनेक घटनांचा त्यांनी उल्लेख केलाअभिजीत कदम सध्या पिंपरी चिंचवड शहरात आम आदमी पक्षाचे विद्यार्थी आघाडीचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत त्यांनी या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला आहे. एका सामान्य कुटुंबातून आलेला तरुण पिंपरी चिंचवड शहरातील आम आदमी पक्षाच्या विद्यार्थी आघाडी चा अध्यक्ष कसा झाला याबाबत अभिजीत कदम यांनी स्वतः आपल्या मनोगत ते व्यक्त केले आहे त्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की,

माझा जन्म धाराशिव येथे एका साध्या गरीब कुटुंबात झाला. तिसरीत असताना वडिलांचं निधन झालं आणि घराची सगळी जबाबदारी माझ्या आईच्या खांद्यावर आली. आईने घरकाम करून मोठं केलं. तिचे कष्ट, तिचा त्याग आणि तिचं धैर्य यामुळेच माझ्यात जिद्द, आत्मविश्वास आणि स्वावलंबनाची ताकद निर्माण झाली.

आयुष्यात लहान वयातच मला काम करून स्वतःला उभं करावं लागलं. नववीत असताना मी वृत्तपत्र टाकू लागलो. दहावीमध्ये दूध विकून घराला हातभार लावला. 11वी–12वीच्या काळात नोकरी करून शिक्षण चालू ठेवले. काही काळ सेल्समन म्हणूनही काम केले. आज मी BA च्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे कारण परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षण आणि कष्ट या दोन गोष्टी मी कधी सोडल्या नाहीत.

मला लहानपणापासूनच राजकारणाची आवड होती. रविराज दादांसोबत काम करताना समाजातील अनेक प्रश्न जवळून पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा म्हणून अनेक आंदोलनांमध्ये आम्ही पुढाकार घेतला. हळूहळू समाजकारणाची समज वाढली आणि लोकांसाठी काहीतरी करण्याची जिद्द अधिक बळकट झाली.

छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीमुळे मला समता, न्याय आणि सर्वसमावेशकता यांची खरी ओळख मिळाली. समाजाच्या सर्व घटकांना समान हक्क मिळावेत, त्यांच्यातील ऐक्य वाढावे, आणि सामान्य माणसाचा आवाज ऐकला जावा ही माझी ठाम भूमिका आहे.

राजकारणात प्रवेश करण्यासाठी अनेक पक्ष उपलब्ध असताना मी आम आदमी पक्ष निवडला. कारण हा पक्ष प्रस्थापितांपेक्षा नव्या, मेहनती आणि स्वच्छ विचारांच्या युवा नेतृत्वाला संधी देतो. बदल हवा असेल तर त्यासाठी युवकांनी पुढे येणं आवश्यक आहे ही माझी धारणा आहे.

आज मी विद्यार्थी आघाडी पिंपरी–चिंचवडचा अध्यक्ष म्हणून काम करत आहे. विद्यार्थी, युवक आणि सर्वसामान्यांच्या समस्यांवर प्रामाणिकपणे, पारदर्शकपणे आणि धैर्याने काम करण्याचा माझा निर्धार आहे. माझा प्रवास संघर्षांनी भरलेला असला तरी प्रत्येक संघर्षाने मला अधिक मजबूत बनवलं आहे.

“संघर्षातून घडलेला... विचारांनी प्रेरित... समाजासाठी झटणारा विद्यार्थी युवा नेतृत्व मी अभिजित कदम.”




# आदर्श कामगार किरण दिनकर बागल





पिंपरी चिंचवड शहरातील आदर्श कामगार म्हणून ज्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित केले गेले आहे. असे मोशी प्राधिकरण परिसरातील रहिवासी तथा टाटा मोटर्समध्ये मेकॅनिकल पदावर कार्यरत असणारे किरण दिनकर बागल यांचे सामाजिक कार्य हे उल्लेखनीय आहे.

वृक्षारोपण ,नदी संवर्धन, शैक्षणिक क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन तसेच योग दिनानिमित्त योगा करण्याचे फायदे याबाबत अनेकांना मार्गदर्शन असे किरण बागल यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

त्यांना या आपल्या उल्लेखनीय कार्याबद्दल अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहे.. यामध्ये प्रामुख्याने राज्यस्तरीय श्री स्वामी विवेकानंद कामगार रत्न पुरस्काराने त्यांना संस्कार प्रतिष्ठान वतीने सन्मानित करण्यात आले आहे.

सामाजिक जीवनात आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या विचारातून गेली 25 वर्षे ते आपले सामाजिक काम करत आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने शालेय व महाविद्यालय विद्यार्थ्यांना व्यावसायिक धडे देणे तसेच वृक्ष संवर्धन व पर्यावरण याबाबतच्या जनजागृती योजनेमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असणे योगासनाचे धडे देणे विशेषता वयोवृद्ध व्यक्तींना मोफत योगा शिक्षण देणे व दरवर्षी आपल्या देशाचे स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन उत्साहाने साजरा करत या निमित्ताने अनेक सामाजिक उपक्रम राबविणे असे सामाजिक कार्य किरण दिनकर बागल यांच्यावतीने होत आहेत.

टाटा मोटर्स या कंपनीमध्ये काम करताना त्यांना आदर्श कामगार या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे कार्य, त्यांची कामावरची हजेरी त्यांचे टीमवर्क व नवीन संकल्पनेच्या माध्यमातून कामगारांना त्याचा फायदा होईल असे उपक्रम राबविणे असे अनेक उल्लेखनीय नोंदी किरण दिनकर बागल यांच्या नावे नोंद झाली आहे. अशा या सामाजिक व कामगार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या किरण दिनकर बागल यांना यंदाचा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

# तळेगावमध्ये उमेदवारांची धाकधूक वाढली !



>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

तळेगाव दाभाडे : तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या निवडणुकीत मतमोजणी पुढे ढकलल्यानंतर संपूर्ण राजकीय हवामान ढवळून निघाले असून, उमेदवारांची धाकधूक वाढली आहे.

18 जागा बिनविरोध झाल्याने निवडणुकीतील चुरस कमी झाली आणि त्याचा थेट परिणाम मतदानावर झाला. यंदा पुणे जिल्ह्यात सर्वात कमी 49.24 टक्के मतदान तळेगावमध्ये नोंदले गेले.

नगराध्यक्षपदाची एक जागा आणि तीन प्रभागांतील नगरसेवकपदाच्या चार जागांसाठी दोन डिसेंबरला मतदान झाले. तर उर्वरित सहा जागांसाठी पुनर्मतदान 20 डिसेंबरला होणार आहे. मात्र, मतमोजणीची तारीख 2 डिसेंबरवरून 21 डिसेंबरवर ढकलताच उमेदवार आणि प्रशासन दोघांचीही तयारी कोलमडली आहे.

मतमोजणी उशिरा होणार असल्याने शहरात अफवांना उधाण आले आहे. ईव्हीएममध्ये फेरफार होण्याच्या चर्चा काही उमेदवारांमध्ये रंगू लागल्या आहेत. त्यामुळे अनेकांनी कार्यकर्त्यांकडून मतदानाचा ताळेबंद मागवून ‘आपणच कसे विजयी होऊ’ याची आकडेमोड सुरु केली आहे. कोणत्या प्रभागात किती मतदान झाले, कोणते मतदान लाभदायक, कोणते विरोधकांकडे वळू शकते याचा अंदाज बांधण्याचे सत्र रंगले आहे.

वाढलेल्या कालावधीदरम्यान मतदान यंत्रांची कडेकोट सुरक्षा ही प्रशासनाची मोठी जबाबदारी बनली आहे.

जवळपास 19 दिवस ईव्हीएमचे रक्षण करावे लागणार असल्याने पोलिसांसह संपूर्ण यंत्रणा अलर्टवर आहे.

## थेरगाव चे सुपुत्र,स्वतःला सामाजिक कार्यात वाहून नेणार व्यक्तिमत्व

# अनिकेत परशुराम प्रभु







पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव मध्ये अनिकेत परशुराम प्रभू हे थेरगावचे सुपुत्र सामाजिक कामाची आवड आणि त्यातूनच थेरगाव सोशल फाउंडेशन या सामाजिक संस्थेची स्थापना आणि या थेरगाव सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहरात व थेरगाव परिसरात अनेक सामाजिक उपक्रम याबरोबरच राजकीय क्षेत्रातही कार्यरत असणारे अनिकेत प्रभू हे महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष आहेत.

सामाजिक क्षेत्रात मागील बारा वर्षापासून उल्लेखनीय कामगिरी करत असलेले अनिकेत प्रभू हे अनेक सामाजिक संस्थांवर कार्यरत आहेत, यामध्ये मयूर बाग मित्र मंडळ, रायरेश्वर किल्ले संवर्धन, प्रतिष्ठान व अखिल गणेश नगर युवा प्रतिष्ठान अशा विविध सामाजिक संघटनांवर कार्य करत अनिकेत प्रभू यांनी अनेक उपक्रम राबविले. यामध्ये प्रामुख्याने पुणे जिल्ह्यातील किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबविणे , किल्ल्यांवर ध्वज फडकविणे, शहरातील अनेक भागात स्वच्छता मोहीम राबविणे त्यातूनच प्लास्टिक मुक्तता संदेश देणे तसेच पावसाळ्यात किल्ल्यांवर वृक्षारोपण मोहीम राबविणे असे अनेक उपक्रम अनिकेत प्रभू यांच्या पुढाकाराने राबविले गेले आहेत.

अनिकेत परशुराम प्रभू यांनी वयाच्या सोळाव्या वर्षीच मयूर बाग मित्र मंडळाची स्थापना केली व गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक कार्याला सुरुवात करताना त्यांनी समाजातील अनेक प्रश्न सोडविण्यावर भर दिला. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक उपक्रम राबविले. तसेच रक्तदान शिबिर, तोरण महोत्सव ,शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, किल्ले स्वच्छता मोहीम असे अनेक उपक्रम राबवत असताना त्यांना या सामाजिक कार्यात अनेक त्यांच्या मित्रमंडळींची साथ लाभली, यातूनच त्यांनी रायरेश्वर किल्ले संवर्धन प्रतिष्ठानची स्थापना केली व पुणे जिल्ह्यातील अनेक किल्ल्यांवर स्वच्छता मोहीम राबविली.

अनिकेत परशुराम प्रभू यांनी थेरगाव मध्ये सामाजिक काम करताना थेरगावाच्या विकासासाठी थेरगाव सोशल फाउंडेशन ची स्थापना केली. या माध्यमातून त्यांनी विविध क्षेत्रात काम करणारे अनेक समाजकार्याची आवड असणारे मित्र संघटित केले व थेरगाव मध्ये सामाजिक, प्रशासकीय, आरोग्य स्वच्छता, वाहतूक ,अनेक विभागातील गंभीर प्रश्नांना वाचा फोडत हे प्रश्न मार्गी लावले. प्रामुख्याने थेरगाव सोशल फाउंडेशन वतीने अंघोळीची गोळी मार्फत खिळे मुक्त झाडे उपक्रम त्यांनी राबविला, पुढे जाऊन त्यांनी थेरगाव परिसरातील डांगे चौक येथील ब्रिज खालील पिलर चे झालेले विद्रूपीकरण श्रमदान करून सुशोभीकरण केले. तसेच सार्वजनिक स्वच्छता मोहीम राबवत पुलाखालील स्वच्छतागृहांची स्वच्छता केली. शहरातील अनेक भागात मॅरेथॉन वॉक घेऊन जनजागृती करण्यात आली. तसेच बेवारस व्यक्तींना मदत या सोशल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली. अनेक विकास कामे करत असताना नदी सुधार उपक्रम अनिकेत प्रभू यांनी हाती घेतले व श्रमदान करून पवना नदी निर्मल राहावी यासाठी आपल्या मित्रांसोबत नदी स्वच्छता मोहीम राबविली. त्याचप्रमाणे अनेक वेळा समाजकंटकांच्या वतीने एखादी वाईट घटना घडली की महाराष्ट्राची लाईफ लाईन समजली जाणारी एसटी बस वर त्याचा राग काढला जातो व अनेक ठिकाणी बस वर हल्ला करून ती फोडली जाते अशा सार्वजनिक बसेसच्या संरक्षणाची जबाबदारी ही थेरगाव फाउंडेशनच्या वतीने घेत अनोखे रक्षाबंधन साजरे करत पीएमपीएल बसला राखी बांधून अनिकेत प्रभू यांच्या पुढाकारणे रक्षाबंधन सादर केले गेले या उपक्रमाचे अनेक क्षेत्रातून कौतुक करण्यात आले. थेरगाव सोशल फाउंडेशन च्या वतीने वाकड पोलीस बांधवांना मदत व्हावी याकरिता पोलीस मित्र म्हणून अनेक वेळा मदत करण्यात आली आहे. थेरगाव परिसरात वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजविण्यात यावे तसेच वाहतूक सुरळीत यावी याकरिताही थेरगाव सोशल फाउंडेशन च्या वतीने अनिकेत प्रभू यांच्या पुढाकाराने अनेक उपक्रम राबविले गेले, अनेक मोहिमे पार पाडण्यात आली. वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन करिता झाडांशी मैत्री ही एक संकल्पना थेरगाव सोशल फाउंडेशन च्या वतीने राबविण्यात आली व मैत्री दिन म्हणून तो साजरा करण्यात आला ,.थेरगाव हे सुंदर व स्वच्छ रहावे यासाठी अनेक वेळा थेरगाव सोशल फाउंडेशन च्या वतीने आवाहन करण्यात आले. तसेच रोटरी क्लब ऑफ वाल्हेकर वाडी सोबत नदी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन नदीतील मोठ्या प्रमाणात जलपर्णी काढण्यात थेरगाव सोशल फाउंडेशन चा मोठा सहभाग राहिला आहे.

थेरगाव सोशल फाउंडेशन च्या वतीने कोरोना काळातही अनेक सामाजिक उपक्रम राबविले गेले त्यामध्ये मोफत अन्नधान्य, रक्तदान शिबिरे ,अन्नधान्य किट वाटप तसेच कोरोना महामारीत आलेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे उध्वस्त झालेल्या कुटुंबांना मदतीचा हात देण्यात आला. कोरोना महामारीत आलेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे खालापूर येथील नागरिकांना मदतीचा हात देण्यात आला. तसेच अनेक रुग्णांना प्लाजमा दान करण्या साठी शिबीर आयोजित करण्यात आले. कोरोना काळात सामाजिक उपक्रम राबविताना ऑनलाइन एकपात्री सादरीकरण स्पर्धा, तसेच डॉक्टर लाईव्ह फेसबुक चॅट, पत्रकार बांधवांना मदत ,कोरोना योद्धांचा चा सन्मान, सॅनिटायझर आणि मास्क चे वाटप, कोरोना बाबत जनजागृती असे अनेक उपक्रम अनिकेत प्रभू यांच्या पुढाकारणे राबविण्यात आले आहेत. त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेत त्यांना यंदाचा मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.









# पिंपरी चिंचवड करांना अभिमान वाटावे असे क्षण!

## • पिंपरी चिंचवड वैभव काव्यसंग्रहाचे प्रकाशन
## • संभाजी बारणे यांची संकल्पना, वर्षा उसगावकर यांच्या हस्ते प्रकाशन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - पिंपरी चिंचवड शहरवासीयांना अभिमान वाटावे, असे क्षण म्हणजेच पिंपरी चिंचवड वैभव या काव्यसंग्रहाचे प्रकाशन. पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव परिसरातील सामाजिक कार्यकर्ते तथा कवी लेखक व मनपा वृक्ष प्राधिकरणचे माजी सदस्य संभाजी बारणे यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या एकूण शंभर कवींनी पिंपरी चिंचवड शहरावर केलेल्या कवितांचा संग्रह म्हणजे पिंपरी चिंचवड वैभव या काव्यसंग्रहाचे प्रकाशन महाराष्ट्राची लाडकी हिंदी व मराठी चित्रपटातील ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते करण्यात आले.

"पिंपरी चिंचवड वैभव' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून मांडण्यात आलेला शहराचा पद्यरूप इतिहास ही अतिशय अभिनव संकल्पना आहे!' असे गौरवोद्गार सुप्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर यांनी निगडी प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर (छोटे सभागृह) प्रेक्षागृह येथे बुधवार, दिनांक 03 डिसेंबर 2025 रोजी काढले. महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा आणि मराठी भाषा संवर्धन समिती, पिंपरी-चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने 'पिंपरी चिंचवड वैभव' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना वर्षा उसगावकर बोलत होत्या.

अखिल भारतीय मराठी महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी हे अध्यक्षस्थानी होते; तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवड शाखाध्यक्ष राजन लाखे, शिक्षणतज्ज्ञ डॉ. अभय कुलकर्णी, सनदी लेखापाल प्रा. डॉ. अशोक पगारिया, ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ, माजी नगरसेविका मनीषा पवार, सामाजिक कार्यकर्त्या सुषमा जावळे, कांचन जावळे, आणि पिंपरी-चिंचवड मराठी भाषा संवर्धन समिती सल्लागार संभाजी बारणे यांची व्यासपीठावर प्रमुख



उपस्थिती होती.

वर्षा उसगावकर पुढे म्हणाल्या की, 'गायकाचा सूर लागल्यावर जशी मैफल रंगत जाते त्याप्रमाणे नृत्य आणि गायनाने सुरू झालेला हा प्रकाशनसोहळा उत्तरोत्तर रंगतदार होत गेला.

पूर्वी मला कवितांची भीती वाटायची; पण आमच्या एका कौटुंबिक स्नेहाने 'कविता म्हणजे जीवनाचे सत्त्व असते' असे माझ्या मनावर बिंबवल्यावर मला कवितांची गोडी लागली. 'पिंपरी चिंचवड वैभव' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहात सहभागी झालेल्या सर्व कवींचे मी अभिनंदन करते!' राजन लाखे यांनी लालित्यपूर्ण शैलीतल्या प्रास्ताविकातून सांगितले की, 'महाराष्ट्र साहित्य परिषदेची पिंपरी-चिंचवड शाखा ही पस्तीस वर्षे जुनी असून दोन वेळा संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट शाखा म्हणून सन्मानित झालेली आहे. कवितांच्या माध्यमातून पिंपरी - चिंचवड या शहराचा इतिहास शब्दबद्ध व्हावा, अशी संकल्पना संभाजी बारणे यांनी मांडल्यावर आम्ही शहरातील कवींना आवाहन केले. त्याला प्रतिसाद देत सुमारे 152 कवींनी प्रतिसाद दिला; आणि त्यातून निवड करून काव्यसंग्रहासाठी एकूण 96 कवींच्या कवितांचा समावेश करण्यात आला!' भाऊसाहेब भोईर यांनी मार्मिक



वर्षा उसगावकर यांचा सन्मान संभाजी बारणे व माजी नगरसेविका मनीषा पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

शैलीतून, 'विद्येचे माजघर असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात जागतिक कीर्तीचे मान्यवर येतात, हेच या शहराचे यश आहे!' असे मत व्यक्त केले. डॉ. श्रीपाद जोशी यांनी अध्यक्षीय मनोगतातून, 'भौतिक संसाधनांपेक्षा ऐतिहासिक मूल्यांच्या जपणुकीमध्ये शहराची श्रीमंती ओळखली जाते. पिंपरी-चिंचवड शहराला भोजापूरच्या रूपाने दोन हजार वर्षांपासूनचा समृद्ध इतिहास लाभला आहे. 'पिंपरी चिंचवड वैभव' हा काव्यसंग्रह शहराचे सांस्कृतिक वैभव आहे!' असे विचार मांडले.

ज्येष्ठ लेखिका कै. विनीता ऐनापुरे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रकाशनानंतर प्रा. सुरेखा कटारिया, डॉ. अकिला इनामदार, कमल सोनजे, माधुरी डिसोजा, मंगला पाटसकर, प्रा. सुभाष आहेर, डॉ. नीलकंठ मालाडकर, सीताराम नरके, रमेश पिंजरकर या सहभागी कवींचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला.

फिरोज मुजावर यांनी नृत्यातून गणेशवंदना सादर केली. सुनीता बोडस, किरण लाखे, नीलिमा फाटक यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा आणि मराठी भाषा संवर्धन समिती, पिंपरी-चिंचवड यांच्या पदाधिकाऱ्यांनी संयोजनात परिश्रम घेतले.

गणेश लिंगडे यांनी सूत्रसंचालन केले.

संभाजी बारणे यांनी आभार मानले. रिचा राजन यांनी गायलेल्या भक्तिगीताने कार्यक्रमाचा प्रारंभ आणि पसायदानाने समारोप करण्यात आला.



# विश्वास, परिपक्वता, विकासाचं व्हिजन
# मिनल विशाल यादव

पिंपरी चिंचवड शहरातील प्रभाग क्रमांक 14 मधील माजी नगरसेविका मिनल विशाल यादव यांनी आपल्या कार्यकाळात विकास, सेवा आणि सुरक्षिततेचा ठसा उमटवला आहे. प्रत्येक घटकात त्यांनी लोकाभिमुख दृष्टीकोन ठेवून प्रभागाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्याचा आढावा घेताना काही महत्त्वपूर्ण उपक्रम विशेषत्वाने अधोरेखित करावे लागतात.

भयावह कोरोना संकटात मिनल यादव यांनी जनतेसाठी तत्परपणे सेवा बजावली. मोफत लसीकरण शिबिरे, अन्नछत्र, तसेच इंजेक्शन आणि आवश्यक संसाधनांची उपलब्धता करून नागरिकांच्या मदतीसाठी त्या सतत धावपळ करत राहिल्या. या काळात त्यांची लोकसेवेसाठीची निष्ठा आणि धडपड प्रभागातील जनतेच्या स्मरणात आजही ताजी आहे.

स्थापत्य विभागाच्या सहकार्याने मोहननगर छत्रपती शिवाजी महाराज कामान ते मेहता हॉस्पिटल या महत्त्वाच्या रस्त्याचे संपूर्ण काँक्रीटीकरण करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या रस्त्यामुळे नागरिकांना सुरक्षित आणि सुकर वाहतुकीचा लाभ मिळाला. प्रभागातील सौंदर्यवृद्धीसाठी त्यांनी अनेक उपक्रम हाती घेतले.गाय-वासरु शिल्पाची उभारणी करून परिसराला संस्कृतीचा आणि आकर्षकतेचा स्पर्श दिला. बालाजी चौकात नवीन दीपमाळ उभारून परिसराचे धार्मिक आणि सौंदर्यात्मक महत्त्व अधिक वृद्धिंगत केले. मिनल यादव यांनी शंकर शेट्टी परिसरामध्ये अक्षरबाग सुरु करून मुलांसाठी आणि रहिवाशांसाठी शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्राची निर्मिती केली. या उपक्रमामुळे समाजातील शैक्षणिक वातावरणात सकारात्मक बदल घडून आला.

मोहननगर परिसरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी त्यांनी संपूर्ण भाग सीसीटीव्ही कव्हरेजमध्ये आणला. या उपक्रमामुळे नागरिकांच्या सुरक्षेची हमी वाढली आणि गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवता आले.

महिला सशक्तीकरणासाठी मिनल यादव यांनी अनेक बचत गटांना प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली. या शिबिरांमुळे अनेक महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आणि आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग मोकळा झाला. मिनल विशाल यादव यांनी प्रभाग क्रमांक 14 मध्ये केलेले कार्य हे त्यांच्या लोकाभिमुख दृष्टीकोनाचे द्योतक आहे.

विकासकामे, सेवा, सुरक्षा आणि महिला सबलीकरण या सर्व क्षेत्रांत त्यांनी प्रभागाला पुढे नेण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे नागरिकांकडून कौतुक केले जाते. त्यांची काम करण्याची ऊर्जा, सर्वसामान्यांशी असलेला निगडीतपणा आणि समस्यांवर तत्पर तोडगा काढण्याची वृत्ती हेच त्यांचे वैशिष्ट्य. भविष्यातही अशाच कार्यक्षम नेतृत्वाची प्रभागाला अपेक्षा आहे.

मिनल विशाल यादव यांच्या कार्याची दखल घेत त्यांना यंदाचा मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे

# पिंपरी चिंचवड शहरातील यशस्वी उद्योजक, सामाजिक, राजकीय व व्यक्तिमत्व
# संजय जगताप



पिंपरी चिंचवड शहर ही उद्योग नगरी म्हणून ओळखली जाते. या शहरात मोठमोठे उद्योग, मोठमोठे व्यवसाय व या उद्योग नगरीत असणारी कामगारांची संख्या त्यामुळे हे शहर उद्योग नगरी तसेच कामगार नगरी म्हणूनही ओळखले जाते. याच उद्योग नगरी व कामगार नगरीमध्ये संजय जगताप यांनी एक यशस्वी उद्योजक म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. अथक परिश्रम, जिद्द व आत्मविश्वासाच्या जोरावर संजय जगताप यांनी पिंपरी चिंचवड शहरात औद्योगिक क्षेत्रात नावलौकिक मिळविला आहे.

व्यावसायिक क्षेत्रात काम करताना संजय जगताप यांनी यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक मिळविला तर आहेच पण याचबरोबर त्यांनी या पिंपरी चिंचवड शहरातील लघुउद्योग असणाऱ्या छोटे छोटे व्यावसायिकांच्या समस्या सोडविण्यावर ही भर दिला आहे. संजय जगताप हे सध्या पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.लघुउद्योग संघटनेच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहरातील लघु उद्योगांचे प्रश्न सोडवण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात.

औद्योगिक क्षेत्रात लघुउद्योग व्यावसायिकांना न्याय देताना त्यांना अनेक क्षेत्रातून अनेक स्तरातून मदत मिळावी यासाठी संजय जगताप हे प्रयत्नशील असतात.

औद्योगिक क्षेत्रात पाऊल ठेवताना प्रथम संजय जगताप यांनी सन 1994 साली चिखली कुदळवाडी येथे श्री गणेश इंजिनियर्स या नावाने एक लेथ मशीन घेऊन व दोन कामगारांमध्ये स्वतः जागेत लघुउद्योग व्यवसाय सुरु केला.त्यात त्यांना यश प्राप्त होत गेले , सलग पाच वर्ष या छोट्याश्या व्यवसायात प्रगती करत त्यांनी पुढील काळात लघुउद्योग व्यवसायामध्ये वाढ केली व एकाच ठिकाणी 100 कामगार काम करतील एवढ्या प्रमाणात आपला उद्योग वाढवीत त्यांनी अनेक बेरोजगारांना रोजगाराची संधी दिली.

औद्योगिक क्षेत्रात काम करताना प्रगती करत त्यांनी सन 2019 मध्ये संजय जगताप अँड असोसिएट या नावाने जमीन खरेदी विक्री व प्लॉटिंग व्यवसाय सुरु केला व त्यातही एक यशस्वी व्यावसायिक म्हणून त्यांनी पुढे वाटचाल सुरुच ठेवली.

एखाद्य कर्तृत्ववान माणसात काही तरी करण्याची जिद्द असते, ती जिद्द त्या माणसाला स्वस्त बसू देत नाही अशीच जिद्द संजय जगताप यांच्यामध्ये असल्याने त्यांनी पिंपरी चिंचवड शहरातील हॉटेल इंडस्ट्रीमध्ये आपले पाऊल ठेवले व सन 2022 मध्ये पुनवळे येथे हॉटेल स्काय ब्लू सुरु केले या व्यवसायातही संजय जगताप यांनी योग्य नियोजन, परिपूर्ण अभ्यास, परफेक्ट हॉटेल मॅनेजमेंट या जोरावर हॉटेलिंग व्यवसायात ज्ञान प्राप्त केले व पुढे सन 2023 मध्ये मोरवाडी परिसरात आमंत्रण फिश नावाचे दुसरे हॉटेल सुरु केले. त्यातही त्यांना यश आले व त्यांनी लगेचच सन 2025 मध्ये रावेत मध्ये हॉटेल आमंत्रण व जेके फूड पार्क नावाने खाद्य प्रेमींना नवीन दालन उपलब्ध करून दिले.

व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्रात इतके व्यस्त असताना त्यांनी समाजकारण आणि राजकीय क्षेत्रात हि उल्लेखनीय कामगिरी करत आहेत . सामाजिक काम करताना ज्या लहान लहान औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या लघुउद्योग व्यावसायिकांना तसेच येथील कामगारांना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याचे काम संजय जगताप यांनी केले.

औद्योगिक क्षेत्रात अनेक समस्या आहेत. वीज, पाणी, रस्ते अशा अनेक समस्या सोडविण्याचे काम सध्या संजय जगताप करत आहेत. त्याचबरोबर पिंपरी चिंचवड शहरातील गोर गरीब व मध्यम वर्गातील नागरिकांना घर बांधण्यासाठी संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून कर्जपुरवठा करून त्यांचे घराचे स्वप्न पूर्ण केले. संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेच्या सचिव पदी ते कार्यरत आहेत.

तसेच छोट्या-मोठ्या लघुउद्योग व्यावसायिकांना कर्जपुरवठा करून त्यांना व्यवसाय वाढीसाठी संजय जगताप यांनी प्रोत्साहन दिले आहे.

संजय जगताप हे फक्त औद्योगिक क्षेत्रात नसून ते सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही कार्यरत आहेत अनेक सामाजिक संस्थेवर सध्या ते कार्य करीत आहेत यामध्ये लघु उद्योग संघटनेच्या उपाध्यक्षपदीचे कार्यकर्ता असून राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर जिल्हा सरचिटणीस पदी ते राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत तसेच संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेच्या सचिवपदी ते उल्लेखनीय काम करत असून अनेक नागरिकांना या माध्यमातून त्यांनी प्रोत्साहित केले आहे.

राजकीय क्षेत्रात काम करताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष च्या माध्यमातून संजय जगताप यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत, तसेच राष्ट्रवादी पक्षाच्या अनेक उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असतो, राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून संजय जगताप हे अनेक उद्योग क्षेत्रातील, कामगार क्षेत्रातील, सामान्य नागरिक, यांच्या समस्या सोडविण्याचे काम करत आहेत.

संजय जगताप यांनी प्रशासनाच्या चुकीच्या कारभारावर ही अनेक वेळा आवाज उठविला आहे. प्रशासनाच्या विरोधात अनेक आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

उद्योगद्योगिक क्षेत्रात व व्यवसायामध्ये असणाऱ्या अडीअडचणी समस्या यांची परिपूर्ण जाण संजय जगताप यांना असल्याने त्यांनी इतर अनेक छोट्या-मोठ्या लघुउद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या व्यावसायिकांना तसेच कामगारांना अनेक माध्यमातून मदत व त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याचे काम केले आहे अनेक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिल्या आहे.

त्यांच्या याच कार्याची दखल घेत त्यांना यंदाचा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे.







दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत बातमीपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक शबनम सय्यद व संपादक सय्यद रफिक हुसेन यांनी सनशाईन ग्राफिक्स डिझाईन प्रिंटिंग प्रेस येथे छापून 16 नंबर बस स्टॉप जवळ थेरगाव , पिंपरी चिंचवड ,पुणे-33 येथून प्रकाशित केले आहे.
सदर अंकातील बातमी, मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही (न्याय कक्षा पुणे न्यायालय) अधिक माहितीसाठी संपर्क : 8999948968

Dainik metro City Vrutant a Daily newspaper, printed publish and owned by Shabnam sayyed and editor Sayyed Rafique Hussain and printed at Sunshine graphics printing press and published near,16 number bus stop, thergaon ,Chinchwad Pune 33, ,(responsible for editorial content as per PRB act.) newspaper legal cases will be settled in Pune court www.metrocityvrutant.in RNI - MAHMAR /2021/51259 metrocity924@gmail.com

# जनसेवेचा वाढता आलेख » मारुती जाधव

घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची. मात्र त्या परिस्थितीपुढे हार न मानता शिक्षण घ्यायला सुरुवात केली. पुढे कमवा आणि शिका या पद्धतीचा वापर करत आयटीआयमध्ये सिव्हिल इन्फ्रास्ट्रक्चरचा कोर्स पूर्ण केला. पुढे ट्रॅव्हल्सचा व्यवसाय करायला सुरुवात केली. त्या व्यवसायात असतानाच जनसेवेच्या वाटेवर आणले. ते करता करता अचानक महापालिकेत नोकरीला सुरुवात केली. मात्र त्या नोकरीचा उपयोगही अनेकांचे प्राण वाचवण्यासाठी करत असे काही काम सुरु केले, की या मारुतीने जणू जनसेवेची हनुमान उडी घेतली.

मारुती गणपतराव जाधव यांचा जन्म जरी या शहरात झाला असला तरी हे जाधव कुटुंब मूळचे धाराशिव जिल्ह्याच्या भूम तालुक्यातील वांगी गावचे. त्यांचे वडील उदरनिर्वाहासाठी पिंपरी चिंचवड शहरात आले. या भूमीतच कायमचे स्थायिक होण्याचे ठरवत त्यांनी आयुष्याशी टकरा घ्यायला सुरुवात केली. या जगण्याच्या लढाईत त्यांना त्यांच्या पत्नीने भरभक्कमणे साथ दिली. ते करताना मारुती जाधव यांच्या आईने प्रसंगी इतरांच्या घरची धुणी भांडी करण्यास त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. कितीही कष्ट उपसावे लागले तरी चालतील पण आपल्या तीनही मुलांना उत्तम माणूस म्हणून घडवायचे असे त्यांनी ठरवले. त्या निर्धारातूनच मारुती जाधव घडत गेले.

## कोवळ्या वयातच जबाबदारीची जाणीव

मारुती जाधव यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी लवकरात लवकर स्वतःचे पायावर उभे रहावे या हेतूने त्यांच्या वडीलांनी त्यांना आयटीआयमध्ये दाखल केले. त्या ठिकाणी सिव्हिल ड्राफ्ट्समनचा कोर्स करतानाच त्यांना जबाबदारीची जाणीव होत गेली. घरत्ती परिस्थिती हालाखिची, आणखी दोन बंधु व्यामुळे दहावीनंतर महाविद्यालयात शिक्षणासाठी न जाता आपल्याला आयटीआयला जावे लागल्याची जाणीव मारुती जाधव यांना होती. त्यामुळे आयटीआय करतानाच त्यांनी स्वतः ही कामे करुन घराला हातभार लावायला सुरुवात केली. ते करताना अवघ्या सोळा सतरा वर्षांचे मारुती जाधव मंडप उभारणीच्या कामासाठी राबू लागले. त्यातून तेव्हा दिवसाची मजूरी अवधी वीस ते पंचवीस रुपये मिळायची, मात्र ते पैसे ते घरात आईकडे सुपूर्त करुन चिमुरड्या वयात स्वतःतील जबाबदारीची जाणीव दाखवून द्यायचे.

## हाती आले व्यवसायाचे चक्र

याच दरम्यान मारुती जाधव यांच्या मित्राने त्यांना चारचाकी वाहन चालवायला शिकवले आणि व्यवसायाच्या संधीचे एक नवे द्वार त्यांच्यासाठी खुले झाले. चार चाकी वाहन चालवायला शिकल्याने एक वेगळ्या प्रकारचा आत्मविश्वास मारुती जाधव यांच्यामध्ये आला. त्या आत्मविश्वाच्या बळावर त्यांनी स्वतःचा उद्योग सुरु करण्याचे ठरवले. त्यातूनच त्यांनी एक जुनी इंडिका कार खरेदी केली. त्या कारच्या माध्यमातून त्यांनी ट्रॅव्हल्स व्यवसायाला सुरुवात केली. स्वतःची गाडी स्वतः चालवत त्यांनी कार भाड्याने देण्याचा व्यवसाय सुरु केला. या व्यवसायामुळे ट्रॅव्हलिंग




व्यवसायाची गोडीच त्यांना लागली. त्यामुळे त्यांनी कृष्णानगरमध्ये ट्रॅव्हल बसचे बुकींग घ्यायला सुरुवात केली. त्यातूनही बऱ्यापैकी कमाई होत असताना त्यांनी त्यांच्या मित्राची तवेरा गाडी भाडेतत्वावर चालवायला घेतली. ती गाडी तळवडे एमआयडीसीत त्यांनी एका कंपनीला लावली. त्यामुळे मारुती जाधव आणखीनच व्यस्त झाले. सलग दोन दोन तीन तीन दिवस ते या व्यवसायानिमित्त बाहेर राहू लागले. श्री गणेश टूर्स अँड ट्रॅव्हल्स या नावाने आपला छोटासा व्यवसाय यशस्वीपणे चालवतानाही त्यांनी आपल्यातील सामाजिक तळमळ जपत जेथे जेथे मदत करणे शक्य आहे अशा अनेकांना मदतीचा हात द्यायला सुरुवात केली.

## महापालिकेच्या सेवेत दाखल

वाहन व्यवसायात कायम व्यग्र रहावे लागत असल्याने वारंवार घरापासून दूर रहावे लागत होते. त्यामुळे स्थिर आणि सुरक्षित आयुष्याच्या दृष्टीने कुटुंबियांनी मारुती जाधव यांना नोकरी करण्याचा सल्ला दिला. त्याला कारण होते पिंपरी चिंचवड महापालिकेने चालक पदासाठी दिलेली जाहीरात. त्यामुळे मारुती जाधव यांनी या पदासाठी अर्ज केला आणि ते निवडलेही गेले. त्यानंतर ते महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या रुग्णवाहिकेवर चालक म्हणून रुजू झाले. या नोकरीने व्यवसायातील प्रगतीच्या संधी गोठवून टाकल्या असल्या तरी या नोकरीनेच त्यांना जनसेवेची मोठी संधी त्यांना उपलब्ध करुन दिली.

## कोविड काळात प्राणांची बाजी लावून काम

कोविड काळात आपलीही लोकं जेव्हा परकी झाली तेव्हा वैद्यकीय सेवेतील सर्वच पायरींवरील लोक देवदूत म्हणून धावून आले. त्या धावणाऱ्यांमध्ये मारुती जाधव हे एक होते. अक्षरश अनेक कोविडग्रस्त रुग्ण एकटे असताना त्यांच्यापर्यंत जावून त्यांना रुग्णवाहिकेत दाखल करुन हॉस्पिटलपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी दिवस रात्र कष्ट घेतले. ते कष्ट घेताना त्यांनी स्वतःच्या प्राणांचीच जणू बाजी लावली. अनेकदा केवळ फोन यायचा की अमूक ठिकाणी कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण असून त्याला उपचारासाठी दाखल करायचे आहे. अशावेळी प्रचंड वेगाने कोणत्या रुग्णालयात बेड उपलब्ध आहे याची माहिती घेवून मारुती जाधव रुग्णवाहिका घेवून सुसाट वेगाने निघायचे. सर्वप्रथम त्या रुग्णाला दिलासा देवून त्याच्यात बरा होईन हा आत्मविश्वास निर्माण करायचे आणि त्या रुग्णाला जंबो कोविड सेंटर, वायसीएम किंवा जेथे बेड उपलब्ध असेल अशा ठिकाणी नेवून दाखल करायचे. त्यांच्या या तळमळीच्या तडफदार कामगिरीने अनेक रुग्णांचे प्राण वाचले. केवळ रुग्णांना त्यांनी हा कृतिशील दिलासा दिला नाही तर त्या रुग्णापासून दूर असणाऱ्या नातेवाईकांनाही त्यांना त्या काळात दिलासा देण्याचे काम केले. या आजाराची भयानक परिस्थिती स्वतः पाहत असल्याने परिसरातील गरजूंना त्यांनी मोफत सॅनिटायझर व मास्कचेही वाटप केले.

## रुग्णांपर्यंत डॉक्टरांना पोहोचवले.

कोविड काळात डॉ. विनायक पाटील यांनी जणू कोविड योद्धा म्हणूनच काम केले. त्या काळात डॉ. विनायक पाटील हे कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार करण्यासाठी विविध हॉस्पिटल्समध्ये धावपळ करत होते. त्या काळात जणू सारे जग ठप्प झाले होते. संसर्गाच्या भितीने कोणीही कोणाच्या जवळ जायला तयार नव्हते. अशावेळी प्रत्यक्ष कोरोना बाधित रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉ. विनायक पाटील यांनी तातडीने विविध हॉस्पिटलमध्ये पोहोचवण्याची महत्वपूर्ण कामगिरीही मारुती जाधव यांनी आपल्या सारथ्य कौशल्याने पार पाडली. स्वतः अनेक रुग्णांना विविध हॉस्पिटलमध्ये वेळेत पोहोचवून त्या रुग्णांचे प्राण वाचवणाऱ्या मारुती जाधव यांनी डॉक्टरांनाही रुग्णापर्यंत पोहोचवून सामान्य माणसातील जनसेवेच्या अफाट ताकदीचेच जणू दर्शन घडवले.

## कै. एकनाथ थोरात यांचा सहवास प्रेरणादायी

महापालिकेच्या सेवेत असतानाच मारुती जाधव यांना ज्येष्ठ नेते कै. एकनाथ थोरात यांचा सहवास लाभला. त्यामुळे आधीच्याच जनसेवेच्या तळमळीला थोरात यांनी खतपाणी घातले. त्यांच्या त्या कृतीतून आपल्याला स्वतःपेक्षाही इतरांचा विचार प्राधान्याने करण्याचा संस्कार लाभला, असे जाधव आवर्जून सांगतात. कै. एकनाथ थोरात यांच्या प्रेरणेने त्यांच्या सामाजिक उपक्रमांचा जणू विस्तार झाला, आपण नोकरीत असलो तरी आपण आपल्या परीने जे जे समाजासाठी करु शकतो ते केले पाहिजे, हा निर्धार त्यांच्या ठायी बळावला. या निर्धारातून त्यांनी आपल्या चालक पदाची नोकरीही सर्वसामांन्यांना कशी जीवनदायी ठरु शकते याचा आदर्श निर्माण केला.

## तळवडे दुर्घटनेतील रुग्णांना 9 मिनिटात उपचार

मारुती जाधव यांच्या तत्परतेचे अगदी अलिकडचे आणखी एक उदाहरण द्यायचे तर तळवडे येथील आगीच्या भीषण घटनेतील जखमींना त्यांनी अवघ्या 9 मिनिटांत रुग्णवाहिकेद्वारे रुग्णालयात दाखल केले. यातील मृतांसोबत जखमींना त्यांनी रुग्णालयात गेळेवर पोहोत्तनल्याने मृतांची संख्या नाढू शकली नाही. केवळ नोकरीवर असतानात्त नव्हे तर इतरवेळीही कुठे अपघात झाला तर जखमींना स्वतः ते खासगी वाहनाने रुग्णालयात दाखल करतात.

## सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा

आपल्या उपक्रमशिलतेचा दाखला देत मारुती जाधव हे आपला वाढदिवस शहरातील महापुरुषांच्या पुतळ्याची स्वच्छता स्वतः करत असतात. आ. महेशदादा लांडगे यांच्या वाढदिनी तर त्यांनी अडीच हजार गाईंसाठी चारा दिला. महात्मा फुले नगर येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा साकारले जावे यासाठीही पुढाकार घेतला. त्याचबरोबर त्यांनी केंब्रीज चाम्स इंटरनॅशनल प्री स्कुलची शाखा त्यांनी कृष्णानगरमध्ये सुरु केली. पहिलेच वर्ष असूनही या शाळेत 90 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. ही संख्या मारुती जाधव यांच्या सामाजिक निष्ठेची पोहोचपावती देणारी आहे. पत्नी किर्ती यांनी या सर्व वाटचालीत दिलेली भक्कम साथ, पाठबळ मारुती जाधव यांच्यासाठी नेहमीच बळ देणारे ठरले. त्यामुळेच पत्नी किर्ती जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी नोकरी महोत्सवाचे यशस्वी आयोजन करत 450 युवकांना रोजगार उपलब्ध करुन दिला.

अशा कितीतरी कामांतून एक सर्वसामान्य व्यक्तिही समाजाच्या किती उपयोगी पडू शकते याचेच उदाहरण मारुती जाधव यांनी घालून दिले आहे. सामान्य माणसाची ताकद काय असते हे दाखवून देणारी ही सामाजिक वाटचाल त्यामुळेच गौरवास्पद ठरते.




# समाजातील सर्वस्तरीय नेतृत्वाची प्रेरणादायी कामगिरी

# अॅड.विशाल मुरलीधर जाधव

भोसरी विधानसभा कायदेशीर विभाग (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) चे अध्यक्ष आणि व्यावसायिकरीत्या वकिली व्यवसाय करणारे अॅड. विशाल मुरलीधर जाधव हे पिंपरी–चिंचवड शहरातील समाजकार्यातून उभे राहिलेले लोकप्रिय युवा नेतृत्व आहे. बीएएलएलबीचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी कायदा, न्याय आणि समाजकारण या तीनही क्षेत्रांत कार्याची ठोस ओळख निर्माण केली आहे.

2010 साली राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रभागाध्यक्षपदी त्यांची निवड झाली आणि त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात झाली. त्यानंतर पिंपरी–चिंचवड शहर उपाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत असताना त्यांनी पक्षविस्तार, संघटन बांधणी आणि युवकांना राजकारणात पुढे आणण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सध्या ते भोसरी विधानसभा कायदेशीर विभागाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

अॅड. विशाल जाधव यांचे समाजकारण हे केवळ कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता लोकांच्या गरजांशी जोडलेले आहे. देहू–पंढरपूर वारीदरम्यान वारकऱ्यांना अन्नदान व आर्थिक मदत, शालेय विद्यार्थ्यांना साहित्यवाटप, अनाथाश्रमातील सेवा, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ते मुस्लिम बांधवांना ईद-इफ्तार – प्रत्येक समाजघटकाला स्पर्श करणारा त्यांचा वावर दिसून येतो.

## सांस्कृतिक परंपरांची जपणूक

प्रभागात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भव्य कीर्तन महोत्सव, दहीहंडी, नवरात्रोत्सव, शिवजयंती, गणेशोत्सव अशा उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी संस्कृती कार्यक्रमांचे आयोजन हे विशेष आकर्षण ठरते. तसेच महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम, गृहउपयोगी भेटवस्तूंचे वितरण, मुलांसाठी दिवाळी किल्ले स्पर्धा, सफाई कर्मचाऱ्यांना मिठाईवाटप, तिळगुळ व कॅलेंडर वाटप अशा उपक्रमांद्वारे त्यांनी प्रभागात आनंदाचे वातावरण निर्माण केले आहे. त्याचसोबत युवकांना व्यासपीठ देण्यासाठी त्यांनी "अँड. विशाल भाऊ जाधव स्पोर्ट्स क्लब" ची स्थापना केली. प्रीमियर लीग, वकृत्व स्पर्धा, विविध क्रीडा स्पर्धांना मदत आणि प्रोत्साहन देऊन त्यांनी तरुणाईत सकारात्मक ऊर्जा निर्माण केली आहे.

## कोविड काळातील उल्लेखनीय सेवा

कोविड महामारीच्या भीषण काळात अॅड. जाधव यांनी गरजूंना मदत, मोफत लसीकरण शिबिरे, डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचा सत्कार, तसेच अन्नधान्य वितरण अशी अनेक अत्यावश्यक कामे केली. त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान, नेत्र तपासणी, मधुमेह तपासणी आणि चष्मेवाटप शिबिरे आयोजित झाली.

## प्रभागाच्या विकासासाठी सातत्यपूर्ण लढा

* 18 मीटर शिवरस्त्यासाठी निवेदन व पाठपुरावा
* बैलगाडा शर्यती पुन्हा सुरु करण्यासाठी प्रयत्न
* वीज अनियमिततेवर महावितरण कार्यालयात कंदील आंदोलन
* जाधववाडी – विसावा चौक पाण्यात झाडे लावून अनोखे आंदोलन
* कोर्ट परिसरात वृक्षारोपण
* प्रभागातील मंदिरांना साहित्य वाटप व सभागृहातील फरशी अर्पण

या कामांमुळे प्रभागातील लोकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर ठोस भूमिका घेणारा नेता म्हणून त्यांची ओळख मजबूत झाली आहे.

पक्षाप्रती निष्ठा जपत अॅड. जाधव यांनी नगरसेवक, लोकसभा, विधानसभा अशा प्रत्येक निवडणुकीत जोशात सहभाग घेतला आहे. संघटन व कार्यकर्त्यांचा विश्वास जिंकणारे ते एक प्रभावी कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात.

अॅड. विशाल मुरलीधर जाधव यांचे कार्य हे केवळ राजकीय मर्यादेपुरते नाही, तर सामाजिक–सांस्कृतिक विकास, शिक्षण, क्रीडा, पर्यावरण, धार्मिक कार्यक्रम, आपत्ती काळातील मदत या सर्व अंगांनी परिपूर्ण आहे. प्रभागातील प्रत्येक घटकाला हात जोडणारे आणि त्यांच्या समस्या जाणून घेऊन उपाययोजना करणारे सर्वसमावेशक नेतृत्व म्हणजे अॅड. विशाल जाधव.




# सक्षम समाज घडविण्यासाठी अग्रेसर

# सौ.अश्विनी नामदेव शिंदे

सौ. अश्विनी नामदेव शिंदे या मागील तीस वर्षापासून राजकीय, सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत.

आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, नोकरी महोत्सव, महिलांचे संघटन, महिलांना रोजगार निर्मिती , महिलांना लघुउद्योग असे अनेक उपक्रम अश्विनी नामदेव शिंदे यांच्या पुढाकाराने राबविले जात आहेत.

राजकीय व सामाजिक कार्याचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. महिलांना सक्षम करण्यासाठी त्या उपक्रम राबवितात तसेच समाजातील युवक युवतींसाठी त्यांच्या पुढाकाराने अनेक उपक्रम राबविले जातात व लहान मुलांसाठी ही विविध स्तरावर सामाजिक उपक्रम राबवून सक्षम समाज घडविण्यासाठी अश्विनी नामदेव शिंदे या प्रयत्न करत आहेत.

त्यांच्या माध्यमातून समाजातील अनेक घटकांना लाभ मिळाला आहे. अनेक वर्षापासून सामाजिक कार्य करताना समाजातील प्रत्येक घटकातील नागरिकांशी आपुलकीचे नाते त्यांनी निर्माण केले आहे. दरवर्षी महिलांना एकत्रित आणून हळदीकुंकवाचा कार्यक्रम घेणे तसेच विविध समारंभामध्ये महिलांना सहभागी करून घेऊन समारंभ साजरे करणे, गणेशोत्सव ,दिवाळी ,दसरा, नवरात्र अशा सण समारंभाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रम राबवून संघटन वाढवणे, महिलांना लघुउद्योग उपलब्ध करून देणे या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात झाले . लहान मुलांना शैक्षणिक उपक्रम तसेच मैदानी खेळ व स्व रक्षणाचे धडे यासाठीही अश्विनी नामदेव शिंदे यांनी अनेक उपक्रम राबविले आहेत. पिंपरी चिंचवड शहरातच नाही तर संपूर्ण पुणे जिल्ह्यात त्यांनी आपल्या सामाजिक कामाने अनेकांना लाभ मिळवून दिला आहे. नोकरदार असो कामगार वर्ग असो किंवा शैक्षणिक क्षेत्रातील समस्या असो तसेच समाजातील अनेक अडचणी सोडविण्यासाठी अश्विनीताई शिंदे यांचा नेहमी पुढाकार असतो.

विशेषतः महिलांना रोजगार निर्मिती करून देणे व महिलांना सक्षम करणे हा त्यांचा प्रमुख उद्देश राहिला आहे. या माध्यमातून त्यांनी आज पर्यंत अनेक महिलांना रोजगार निर्मिती करून दिली आहे. आज त्या महिला स्वतःचा रोजगार चालवून आपली एक नवीन ओळख निर्माण करण्यासाठी यशस्वी झाल्या आहेत.

सामाजिक कार्याबरोबरच राजकीय क्षेत्रातही अश्विनीताई शिंदे यांनी उल्लेखनीय काम केले आहे. सध्या भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहरात कार्यात आहेत. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. भारतीय जनता पक्षाचे दिलेले कार्यक्रम त्या प्रामाणिकपणे राबवितात .महिला स्वयंरोजगार हा त्यांचा प्रमुख उद्देश राहिला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा ,शैक्षणिक अशा अनेक क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. पिंपरी चिंचवड शहरात अश्विनीताई शिंदे राजकीयदृष्ट्या सक्षम नेतृत्व म्हणून ओळखल्या जातात.

प्रशासनाच्या माध्यमातून त्यांनी अनेक विकास कामांना गती दिली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून होणाऱ्या शहरातील विकास कामात त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहेत.

प्रशासनाच्या चुकीच्या कारभारावर त्यांनी ना नेहमीच आवाज उठविला आहे . अनेक आंदोलनात सहभाग घेऊन त्यांनी प्रशासनावर ताशेरे ओढले आहे.

पिंपरी चिंचवड शहरात भाजपाच्या महिला उपाध्यक्ष म्हणून त्या सध्या कार्यरत आहेत. तर त्यांचे पती नामदेव शिंदे हे भारतीय जनता पक्षाचे प्रधानमंत्री संकट मोचन सरकार महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

सौ अश्विनी नामदेव शिंदे यांना त्यांचे पती नामदेव शिंदे यांचा पूर्ण पाठिंबा असल्याने त्यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. सामाजिक काम करता करता त्यांनी राजकीय जीवनाची सुरुवात करताना राष्ट्रवादी पक्षाला प्राधान्य दिले व नंतर त्यांनी आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याने प्रभावित होत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश करून सध्या त्या भाजपमध्ये प्रामाणिकपणे काम करत आहेत.

आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी त्या इच्छुक असून त्या दृष्टीने त्यांनी आपल्या निवडणुकीची तयारी सुरु केली आहे परंतु निवडणुकीपुरतेच नाही तर आपण मागील 30 वर्षापासून समाजाच्या विकासासाठी काम करत असल्याचे त्यांनी सांगितले आहे त्यांच्या संपूर्ण कार्याचा चढता आलेख पाहता त्यांना यंदाचा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.









दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत www.metrocityvrutant.in | रविवार दिनांक 07/12/2025

## जैन समाजातून सामाजिक क्षेत्रातील उदयोन्मुख चेहरा

# संदेश सुरेशजी गादिया













संदेश सुरेश जी गादिया यांना त्यांच्या कुटुंबीयांमधूनच अगदी लहान वयामध्ये सामाजिक व राजकीय कार्याचे बाळकडू मिळाले आहे. त्यांचे वडील कै. सुरेशजी गादिया हे पिंपरी चिंचवड शहरात भारतीय जनता पक्षाचे जुने जाणते नेते म्हणून ओळखले जातात त्यांनी तीस-पस्तीस वर्षे भारतीय जनता पक्ष शहरात वाढविण्यासाठी अथक परिश्रम केले. लहानपणापासूनच भारतीय जनता पक्षाचे काम व आपले पिंपरी चिंचवड शहर याचा संपूर्ण अभ्यास संदेश गादिया यांना आहे.

संदेश गादिया हे जैन समाजातून एकमेव इच्छुक उमेदवार म्हणून पुढे आले आहे. संदेश गादिया हे अनेक सामाजिक संस्थांमध्ये कार्यरत आहेत, सुरेश गादिया मेमोरियल फाउंडेशन, पिंपरी चिंचवड जैन महासंघ, गणेश गणपती मंडळ, सुदर्शन मित्रमंडळ, भाटिया जैन संघटना अशा विविध सामाजिक संस्थेवर सामाजिक काम करण्याचा अनुभव संदेश गादिया यांना आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवडणूक तब्बल चार वर्षांच्या प्रशासकीय कालावधीनंतर येत्या दोन महिन्यात संपन्न होत आहे. या महानगरपालिका निवडणुकीच्या संदर्भातील आरक्षण सोडत नुकतीच जाहीर झाली. या आरक्षण सोडती मध्ये अनेक दिग्गज नगरसेवकांना धक्का बसला असून त्यांचे राजकीय भवितव्य अडचणीत आले आहे. अशातच इच्छुक उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. भारतीय जनता पक्ष हा पिंपरी चिंचवड शहरातील एक नंबरचा पक्ष झाला असून या भाजपमधूनच इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने वाढली आहे . अशातच प्रभाग क्रमांक 14 मध्ये जैन समाजातून येणारे संदेश सुरेशजी गादिया हे सुशिक्षित इच्छुक उमेदवार पुढे आले आहे.

आरक्षण सोडतीमध्ये प्रभाग क्रमांक 14 मध्ये अ) ओबीसी, ब) महिला सर्वसाधारण, क) महिला सर्वसाधारण, आणि ड) अ राखीव अशी आरक्षण सोडत जाहीर झाली आहे. या आरक्षण सोडती मध्ये खुल्या प्रवर्गातून संदेश सुरेश जी गादिया हे इच्छुक आहेत. संदेश गादिया हे सध्या भारतीय जनता पक्षाच्या जैन प्रकोष्ठ पिंपरी चिंचवड शहर जिल्हा संयोजक पदी कार्यरत आहेत. मागील दोन वर्षांपूर्वीच चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा भाजपचे माजी शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या वतीने त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. तेव्हापासूनच संदेश गादिया हे दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडत आहेत.

प्रभाग क्रमांक 14 मध्ये संदेश गादिया यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत, त्यामध्ये आयुष्यमान भारत कार्ड ही आरोग्यदायी योजना त्यांनी प्रभावीपणे राबविली, तसेच रक्तदान शिबिर असो आरोग्य शिबिर असो हे अनेक वर्षापासून संदेश गादिया राबवित आले आहेत. तसेच डॉक्टर आपल्या दारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका वतीने राबविण्यात येणारे स्वच्छता मोहिमेमध्ये संदेश गदिया यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. त्याचबरोबर स्वच्छता कामगारांचा सत्कार समारंभ त्यांनी आयोजित केला . तसेच वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबविले आहेत, जैन समाजाचा मेळावा मोठ्या प्रमाणात आयोजित करून यशस्वी करून दाखविला आहेत, प्रामुख्याने भगवान महावीर चौक येथे अहिंसास्तंभ उभारणी करिता प्रशासनाशी पाठपुरावा करत काम मार्गी लावण्यात संदेश गादिया यांना यश आले.

आता आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी संदेश गादिया हे तीव्र इच्छुक असून त्यांनी आपली इच्छा पक्षश्रेष्ठींकडे व्यक्त केली आहे. पक्षश्रेष्ठीकडूनही सकारात्मकता मिळाली आहे. संदेश गादिया यांना पक्षश्रेष्ठींवर विश्वास असून भारतीय जनता पक्ष हा सर्व समाजातील घटकांना न्याय देणारा पक्ष आहे . त्यामुळे आपल्याला नक्कीच प्रभाग क्रमांक 14 मध्ये भारतीय जनता पक्ष निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारी देईल असा ठाम आत्मविश्वास संदेश सुरेशजी गादिया यांनी व्यक्त केला आहे.

आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी संदेश गादिया हे तयारी करत असून आपण पूर्ण ताकतीने सदर निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले आहे.

## क्रीडा व सामाजिक क्षेत्रातून समाजकार्य

# आसमा इम्रान शेख



आसमा इम्रान शेख या रयत शिक्षण संस्थेच्या विद्यार्थिनी असून राज्यस्तरीय हॉकी खेळाडू म्हणून त्यांनी उत्तम प्रकारे क्रीडा क्षेत्रात आपली कामगिरी बजावली आहे.क्रीडा व सामाजिक क्षेत्रातून उल्लेखनीय सामाजिक कार्य, आणि यातून समाजात नवलौकिक मिळवीत असलेल्या आसमा इम्रान शेख, यांची कौटुंबिक पार्श्वभूमी ही राजकीय व सामाजिक राहिली आहे, आसमा या क्रीडा क्षेत्रात हॉकी सारख्या जगविख्यात खेळात पारंगत असणाऱ्या एक खेळाडू म्हणून सर्व परिचित आहेत. क्रीडा क्षेत्राच्या कामगिरी सोबतच त्यांना कुटुंबात राजकीय वातावरण मिळाले त्यांचे पती इम्रान शेख हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पिंपरी चिंचवड शहराचे युवक शहराध्यक्ष आहेत. या माध्यमातून इम्रान शेख यांचे राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात वर्चस्व आहे. आपल्या पतीच्या खांद्याला खांदा लावून समाजकार्यात आसमा शेख या नेहमी सक्रिय सहभाग घेत असतात. त्यांना इमरान शेख यांच्यासोबत काम करतानाच सामाजिक व राजकीय दोन्ही क्षेत्रात काम करण्याची संधी मिळत आहे.

यातूनच त्यांनी युनुस भाई शेख स्पोर्ट्स फाउंडेशन या संस्थेच्या अंतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. विशेषता क्रीडापटूंना या फाउंडेशनच्या माध्यमातून नवनवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. पिंपरी चिंचवड शहरात बुद्धिबळ स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा, डान्स स्पर्धा, चित्रकला स्पर्धा अशा विविध स्पर्धेच्या माध्यमातून युवक, युवती महिला व नागरिक यांना अनेक संधी देण्यात आसमा इम्रान शेख यांना यश आले. तसेच आपल्या स्पोर्ट्स फाउंडेशनच्या माध्यमातून सामान्य कुटुंबातील काही गरीब विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी त्यांनी दत्तक घेतले आहे. व या शालेय विद्यार्थ्यांना फाउंडेशनच्या माध्यमातून शिक्षणाचे धडे गिरवितांना अनेक प्रकारे मदत करण्यात येते. इम्रान शेख यांच्यासोबत सामाजिक कार्यात सहभाग घेताना त्यांना राजकीय धडे मिळाले आहे आणि यातूनच पुढील काळात त्या क्रीडा, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात उत्तम प्रकारे काम करतील यात शंका नाही. त्यांच्या या संपूर्ण कार्याची दखल घेत आसमा इम्रान शेख यांना यंदाचा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

# भाजपा आमदार महेश लांडगे यांची हिवाळी अधिवेशन तयारी

## पायाभूत सुविधांसह धोरणात्मक निर्णयासाठी करणार पाठपुरावा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी-चिंचवड शहरातील प्रलंबित प्रश्न आणि विकासकामांना गती देण्यासाठी भाजपा महायुती सरकारने प्राधान्य दिले. त्यामुळे सरसकट शास्तीकर माफीपासून आंद्रा- भामा आसखेड सारखी जलसंजीवनी देणारी योजनापर्यंत पिंपरी-चिंचवडकरांच्या हक्कांना न्याय मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आता शहर “शाश्वत विकासाचाच्या दिशेने” वाटचाल करीत आहे. नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने पुन्हा एकदा पिंपरी-चिंचवडकरांची भूमिका सभागृहात मांडणार आहे. त्यासाठी विविध 15 मुद्यांवर आम्ही तयारी केली आहे, अशी माहिती आमदार महेश लांडगे यांनी दिली.

महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन 8 डिसेंबर 2025 पासून नागपूरात सुरु होत असून, भाजपा आमदार महेश लांडगे यांनी अधिवेशनासाठी तयारी केली आहे. विकासकामांना गती, वाहतूक समस्यांवरील दीर्घकालीन उपाय, सार्वजनिक सुरक्षेशी निगडित प्रश्न, पायाभूत सुविधा, शिक्षण, जलपुरवठा, औद्योगिक वाढ इत्यादी विषयांवर ते एकूण 15 महत्त्वपूर्ण मुद्दे सरकारसमोर मांडणार आहेत.

आमदार लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण राज्यात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने शाळा, रुग्णालये, रेल्वे स्टेशन यांसारख्या सार्वजनिक ठिकाणांहून मोकाट कुत्रे हटवण्याचे निर्देश दिले आहेत. त्याचवेळी, प्राणी जन्म नियंत्रण (ABC) नियमांनुसार निर्जंतुकीकरण, लसीकरण आणि त्यांना त्याच जागी सोडणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले आहे. या अंमलबजावणीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकण्यात आली आहे.या पार्श्वभूमीवर लांडगे यांनी राज्य सरकारने एकसंध आणि कडक धोरण जाहीर करून, मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर प्रभावी बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे.

विशेष म्हणजे, जुन्नर व पुणे ग्रामीण भागात बिबट्यांचे हल्ले वाढत असून, अन्नाच्या अभावामुळे बिबटे मानवी वसाहतीत येत आहेत. त्यामुळे ज्या मोकाट कुत्र्यांचा उपद्रव आहे, त्यांना पकडून बिबटप्रवण क्षेत्रात सोडण्याची व्यवस्था केल्यास बिबट्यांचे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होईल आणि मोकाट कुत्र्यांची समस्या कमी होण्यासही मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

आगामी हिवाळी अधिवेशनात पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएच्या दीर्घकालीन विकासाला प्राधान्य देत, सर्व मुद्द्यांवर सखोल चर्चा व ठोस निर्णय मिळवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे आमदार लांडगे यांनी सांगितले.

### वाहतूक सक्षमीकरण...

पिंपरी-चिंचवड व पुणे महानगराच्या सभोवतालच्या भागात नागरिकरण आणि औद्योगिकरण प्रचंड वेगाने वाढत आहे. हिंजवडी आयटी हब तसेच चाकण–तळेगाव औद्योगिक पट्ट्यात दररोजची वाहतूक कोंडी भीषण स्वरुपात वाढली आहे. आमदार लांडगे यांनी सांगितले की, “सरकार प्रयत्नशील असले तरी अद्याप प्रकल्पांना अपेक्षित गती मिळालेली नाही. यामुळे IT क्षेत्र आणि उद्योग क्षेत्रात नाराजी वाढत आहे.” त्यामुळे त्यांनी सरकारकडे खालील मागण्या केल्या आहेत. वाहतूक समस्यांवरील सर्व प्रकल्प ‘फास्टट्रॅक’वर आणावेत. पुणे रिंगरोड प्रकल्पातील भूसंपादन अडथळे तातडीने दूर करावेत. राष्ट्रीय महामार्गांच्या रुंदीकरण प्रक्रियेची गती वाढवावी. पिंपरी-चिंचवडमध्ये पुणे–नाशिक महामार्गाचे रुंदीकरण व मिसिंग लिंकचे काम गतीमान करण्यासाठी महापालिका पातळीवर विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. संपूर्ण वाहतूक समस्यांसाठी सरकारने कृतीशील, वेळबद्ध प्रकल्प आराखडा जाहीर करावा, याकडे लक्ष वेधण्यात येणार आहे.

### अधिवेशनात हे मुद्दे मांडणार...

शिवचरित्र, जलपुरवठा, शिक्षण, उद्योग, प्राधिकरण विषयांसह इतर प्रमुख मागण्या हिवाळी अधिवेशनात लांडगे यांचा भर खालील मुद्द्यांवरही राहणार आहे. CBSE अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचा सविस्तर इतिहास समाविष्ट करणे. एमसीव्हीसी शिक्षक भरती तातडीने मंजूर करणे. PCNTDA च्या 8,379 भूखंडांना फ्री-होल्ड लाभ मिळवून देणे. पिंपरी-चिंचवडसाठी मुळशी आणि चासकमान धरणातून पाणी आरक्षण निश्चित करणे. मोशी येथे मेडीसिटी प्रकल्प उभारणे. PMRDA च्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राला छत्रपती संभाजी महाराज हे नामकरण करणे.

आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांसाठी गृहयोजना प्रकल्पातील सदनिकाधारकांना दंडमाफी, कुदळवाडी–चिखली अतिक्रमणानंतर IT/Industrial Hub साठी धोरण ठरवणे. PMRDA मध्ये Education Hub (IIT–AIIMS–IIM झोन) साठी धोरणात्मक निर्णय घेणे. पवना, मुळा आणि इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला चालना देणे. रेड झोन व ब्ल्यू लाईन रेडिरेकनर नियमावलीत सुधारणा यासह इव्हेंट–डेकोरेशन व्यवसायिकांसाठी वाहतूक नियम शिथिलता असे मुद्यांवर अधिवेशनात पाठपुरावा करण्यात येणार आहे.

# राज्यात महापालिका निवडणुका आधी होणार !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : राज्यातील महापालिकांच्या निवडणुका आधी होतील आणि दहावी-बारावीच्या परीक्षेनंतर जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका होतील, असे मत उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी (दि.4) व्यक्त केले. येत्या 21 किंवा 22 डिसेंबरला आचारसंहिता लागण्याचे भाकीतही त्यांनी केले.

महापालिका निवडणुकीबाबत भाजपच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक पिंपळे सौदागर येथे पार पडली. त्यानंतर पाटील पत्रकारांशी बोलत होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, उमा खापरे, माजी खासदार अमर साबळे उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्याचा विपर्यास केला गेला. 2 डिसेंबरपर्यंत युती टिकवायची म्हणजे त्यानंतर महायुतीतील पक्ष बसून पुढची दिशा ठरवतील, असा त्यांच्या विधानाचा अर्थ घ्यायला हवा. महापालिकेत महायुती करून लढणार की स्वबळावर याचा सर्वस्वी निर्णय तिन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते घेतील.

पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपमध्ये इतर पक्षांतील काही माजी नगरसेवक येण्यास इच्छुक आहेत. कोण निवडून येईल याबाबत स्थानिक पदाधिकाऱ्यांचे मत घेतले जाईल. सर्वेक्षण आणि पदाधिकाऱ्यांचे मत 90 ठिकाणी जुळते. दहा ठिकाणी जुळत नाही. स्थानिक पदाधिकाऱ्यांचे 90 टक्के नावांबाबत एकमत झाले, तर त्यात प्रदेश नेतृत्व कोणताही हस्तक्षेप करणार नाही. प्रदेशकडून अंतिम मान्यता दिली जाईल. उमेदवार निश्चित होताच जाहीर केले जातील, असेही चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

# दिग्गजांच्या सक्षम अभिनयाची मांदियाळी

# धुरंधर



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

अभिनेता संजय दत्त, आर माधवन, अक्षय खन्ना, अर्जुन रामपाल आणि रणवीर सिंग या दिग्गज अभिनेत्यांच्या अभिनयाने सजलेला सक्षम अभिनयाची मांदियाळी असलेला धुरंदर हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला. सत्य घटनांवर आधारलेला हा चित्रपट म्हणजे भारताने पाकिस्तानातील आतंकवादाच्या मुळावर घातलेला घाव आहे. शत्रूच्या घरात घुसून हेरगिरी करणाऱ्या एजंटची रोमांचक कामगिरी चित्रपटात आहे. 'उरी'च्या यशानंतर दिग्दर्शक आदित्य धरने पडद्यामागच्या हेरगिरीची स्टोरी सादर केली आहे. मायभूमीपासून दूर शत्रूच्या देशात राहून हेरगिरी करणे सोपे नाही. मार्चमध्ये या चित्रपटाचा पुढील भाग येणार आहे.

कथा 1999मधील कंदाहार विमान अपहरणापासून सुरु होते. आयबी चिफ अजय संन्याल अतिरेक्यांशी बोलणी करण्यासाठी पोहोचतात. तेच अतिरेकी पुन्हा2001मध्ये संसदेवर हल्ला करतात. अतिरेकी कारवायांना आळा घालण्यासाठी संन्याल सरकारला मिशन धुरंधरची फाईल देतात. अखेर 2004 मध्ये त्याची सुरुवात होते आणि चित्रपटाचा नायक हमजा अफगाणिस्तानमार्गे पाकिस्तानातील लियारीमध्ये पोहोचतो. तो अंडरवर्ल्ड डॉन रेहमान डकैतच्या टोळीत सामील होतो. त्यानंतर कशाप्रकारे हेरगिरी करतो ते चित्रपटात आहे.

लेखन-दिग्दर्शन - भारतीय इंटेलिजन्सवर आदित्यने इंटेलिजन्ट सिनेमा बनवला आहे. आजवर असंख्य गुप्तहेरांनी देशासाठी प्राणांची बाजी लावत शत्रूच्या गोटात घुसून हेरगिरी केली, पण त्यांचे नाव कुठेही आलेले नाही. हा चित्रपट केवळ त्याची एक झलक आहे. वेगवेगळ्या प्रकरणांच्या माध्यमांतून पटकथा पुढे सरकते. सुरुवातीला गती संथ आहे. रेहमानच्या वडीलांचा पाठलाग करण्याच्या दृश्यापासून चित्रपट खऱ्या अर्थाने पकड घेऊ लागतो. मध्यंतरानंतर घटना वेगात घडतात. प्रेमकथेमागचा उद्देशही पटण्याजोगा आहे. अफलातून वेशभूषा आणि धडाकेबाज ॲक्शन या जमेच्या बाजू आहेत. 'घर मे घुसेंगे भी और मारेंगे भी...', 'रेहमान डकैत की दी हुई मौत कसाईनुमा होती है...' सारखे काही डायलॉग चांगले आहेत. 'ना तो कारवा की तलाश है...'सह इतर गाणी श्रवणीय आहेत. बोलीभाषेत पाकिस्तानी लहेजा जाणवत नाही.

हमजा म्हणजेच जसकीरत सिंग रागी ही व्यक्तिरेखा रणवीर सिंगने जीवंत केली आहे. घातक लूक व सहजसुंदर अभिनयाद्वारे रणवीरने हमजा अधिक सुंदररीत्या सादर केला आहे. अक्षय खन्नाने नेहमीच्या शैलीत अत्यंत कमी बोलून डोळे आणि चेहऱ्यावरील हावभावांद्वारे थरारक अभिनय केला आहे. देखण्या सारा अर्जुनने साकारलेली यालीया लक्ष वेधते.अजित डोभाल यांच्या गेटअपमधील आर. माधवनने संन्याल यांच्या व्यक्तिरेखेत सुरेख रंग भरले आहेत. राकेश बेदी यांनी रंगवलेला राजकारणी जमील जमाली जबरदस्त आहे. अर्जुन रामपालने निर्दयी मेजरची भूमिका क्रूरपणे साकारली आहे. संजय दत्त पुन्हा एकदा आपल्या अनोख्या शैलीत भाव खाऊन जातो.